





# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. ०३.०९.२०२६ | अंक नं. १३२ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020







## घराच्या परसबागेत केली गांजाची लागवड

### केडगावमध्ये पोलिसांनी छापा टाकत केली कारवाई, १ लाख ८२ हजार ५०० रुपयांचा गांजा जप्त

नगर – केडगाव परिसरातील तिरंगा चौक, वैष्णवनगर भागात स्वतःच्या घराच्या शेजारील कंपाउंडमध्ये बेकायदेशीरपणे गांजाची लागवड करणाऱ्या एका आरोपीवर कोतवाली पोलीस ठाण्याच्या पथकाने छापा टाकला आहे. विकास बाळू उमाप (वय ३५, रा. तिरंगा चौक, वैष्णवनगर, केडगाव) असे या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

विकास उमाप हा त्याच्या राहत्या घराच्या बाजूला असलेल्या कंपाउंडमध्ये कोणतीही परवाना नसताना गांजाच्या झाडांची लागवड करून त्याची चोरटी निर्मिती व विक्री करत असल्याची खात्रीशीर माहिती कोतवाली पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांच्या सह आणि पंच व फॉरेन्सिक टीमसह नमूद ठिकाणी छापा टाकला.



केडगाव परिसरात गांजाची लागवड करणाऱ्या आरोपीवर कारवाई करताना कोतवाली पोलिसांचे पथक.

घटनास्थळी पाहणी केली असता, पत्र्याच्या शेडच्या घराच्या बाजूला गांजासदृश्य हिरवेगार पानांनी बहरलेली झाडे दिसून आली.

मंडळ कृषी अधिकाऱ्यांनी ती गांजाचीच झाडे असल्याचे निश्चित केल्यानंतर पंचांसमक्ष कुऱ्हाडीच्या साहाय्याने ती झाडे मुळासकट उपटून काढण्यात आली. वजनमापन विभागाच्या अधिकारी व प्रमाणित वजन काट्याच्या उपस्थितीत केलेल्या मोजमापात एकूण १ लाख ८२ हजार ५०० रुपये किमतीचे १८.२५० किलोग्राम वजनाचे ओल्या गांजाची झाडे नमुने जप्त करण्यात आले. या प्रकरणी आरोपी विकास बाळू उमाप याच्याविरुद्ध गुंगीकारक औषधद्रव्ये व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ चे कलम ८(ब), २० (अ) नुसार कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक कुणाल सपकाळे करीत आहेत.

सदर कारवाई पो.नि. नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. कुणाल सपकाळे, पोलीस अंमलदार राहुल शिंदे, सुरज कदम, सचिन लोळगे, अतुल लाटे, गंगाधर आंग्रे, संकेत धिवर, सोमनाथ राऊत, पल्लवी रोहाकले यांच्या पथकाने केली आहे.

## सोन्या, चांदीच्या दरातील घसरणीला ब्रेक, पुन्हा भाववाढ

नवी दिल्ली – सोने आणि चांदीचे दर कधी कोणत्या दिशेने वळण घेतील याबाबत आता कोणीही खात्रीने सांगू शकत नाही. मागील महिन्याभरात तेजीनंतर अलीकडच्या दिवसांत सोन्या-चांदीच्या किमतीत चढउतार दिसून आले असून ट्रम्प यांनी मध्य पूर्वेतील लष्करी कारवाईचा विस्तार होण्याची शक्यता फेटाळून लावली आणि त्यामुळे महागाईबाबत भीती कमी झाल्याने ३ सप्टेंबर रोजी आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याचे भाव स्थिर राहिले.

ऊर्जा-आधारित महागाईबाबत चिंता कमी झाल्याने आणि अमेरिकन डॉलरमधील घसरणीमुळे सराफा बाजारातील दरांना आधार मिळाला, परिणामी ३ सप्टेंबर रोजी सोन्या आणि चांदीचे भाव वधारले. गुरुवारी बाजाराच्या सुरुवातीला सकाळी देशांतर्गत वायदा बाजारात एमसीएक्स वर सोन्याचा वायदा ०.७५ टक्के किंवा सुमारे ११०० रुपयांनी वाढून १.५३ लाखांवर उसळला तर, चांदीचा वायदा भाव ०.८८ टक्के किंवा २००० रुपये वाढीसह २.३८ लाखांच्या आसपास व्यवहार करत आहेत.

## जिममधील तरुणांना नशेचे इंजेक्शन विकणारे तिघे अहिल्यानगरमध्ये जेरबंद

नगर – शहरातील गांधी मैदान परिसरात जिममध्ये जाणाऱ्या तरुणांना नशा आणि ताकद वाढवण्यासाठी बेकायदेशीर औषधे विकणाऱ्या तिघांना कोतवाली पोलिसांनी रंगेहात पकडले. त्यांच्याकडून ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

महिला पोलीस हवालदार रोहिणी अशोक दरंदले यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात याप्रकरणी फिर्याद नोंदवली आहे. पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमुख व पथक शहरात गस्त घालत होते. त्यावेळी गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, मार्कंडेय शाळेसमोर काही तरुण डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय नशेची औषधे विकण्यासाठी थांबले आहेत. पोलिसांनी तातडीने दोन पंचांना सोबत घेऊन औषध निरीक्षक सोमनाथ मुळे यांच्या उपस्थितीत दुपारी छापा टाकला.


या कारवाईत प्रताप अशोक अकोलकर (वय २१, रा. करंजी, ता. पाथर्डी), तेजस गंगाधर वारुळे (वय २१, रा. तपोवन रस्ता, अहिल्यानगर) आणि तेजस अमित उळागड्डे (वय २२, रा. गजानन कॉलनी, अहिल्यानगर) या तिघांना ताब्यात घेण्यात आले. पंचांसमक्ष घेतलेल्या झडतीत त्यांच्या काळ्या पिशवीत कमी रक्तदाबावर वापरल्या जाणाऱ्या मेफेंटरमाइन सल्फेटच्या ४० बाटल्या आणि एक मोटारसायकल असा एकूण ३५ हजार रुपयांचा माल सापडला. चौकशी दरम्यान आरोपींनी कोणतीही परवानगी नसताना ही औषधे समाजमाध्यमावरून ऑनलाईन मागवून नशा करण्यासाठी विक्री करत असल्याची कबुली दिली. डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय हे औषध घेतल्यास भ्रम होणे, चक्कर येणे आणि जीवाला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. अन्न व औषध प्रशासनाने यातील नमुने तपासणीसाठी ताब्यात घेतले असून, तिन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


















जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# बसस्थानकातून दोन प्रवाशांचे महागडे मोबाईल लांबवले

नगर – शहरातील गजबजलेल्या पुणे बसस्थानक परिसरातून दोन प्रवाशांचे महागडे मोबाईल अज्ञात चोरट्याने हातचलाखीने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

नेवासा तालुक्यातील लोहगाव येथील रहिवासी असलेले शेतकरी भास्कर गंगाधर जाधव (वय ६०) हे २ सप्टेंबर रोजी दुपारी अहिल्यानगर येथील पुणे बसस्थानकावर आले होते. बसची वाट पाहत असताना गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्याने भास्कर जाधव यांचा ५३ हजार रुपये किमतीचा आणि त्यांचे सहकारी प्रवासी मोसीन शेख यांचा २५ हजार रुपये किमतीचा असे एकूण ७८ हजार रुपयांचे दोन मोबाईल चोरून नेले. खिशातील मोबाईल गायब झाल्याचे लक्षात येताच त्यांनी परिसरात शोध घेतला, परंतु चोरटा पसार झाला होता.

याप्रकरणी फिर्यादी भास्कर गंगाधर जाधव यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३ (२) नुसार चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार डाके या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. बसस्थानक परिसरातील संशयितांची चौकशी आणि सीसीटीव्हीच्या मदतीने चोरट्याचा शोध सुरू आहे.

# ‘अल नूर’ हॉल चालवण्यासाठी मागितली ५ लाखांची खंडणी

## जीवे मारण्याचीही धमकी देणाऱ्या दोघांवर गुन्हा दाखल

नगर – अहिल्यानगर शहरातील मुकुंदनगर परिसरातील सहारा सिटी येथे सुरू असलेल्या ’अल नूर कम्युनिटी सेंटर’च्या बांधकामावरून आणि हॉल चालवण्यासाठी ५ लाख रुपयांची खंडणी मागितल्याप्रकरणी दोघा जणांवर कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत नुरमोहम्मद आबेद शेख (वय ५०, रा. सहारा सिटी, मुकुंदनगर, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. नुरमोहम्मद शेख हे बांधकाम व्यावसायिक असून, मुकुंदनगर येथील त्यांच्या प्लांट नंबर ५४ आणि ५५ वर ’अल नूर कम्युनिटी सेंटर’ या हॉलचे बांधकाम सुरू आहे. दरम्यान, २ सप्टेंबर रोजी रात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास आरोपी शहबाज जाफर खान उर्फ बाबा खान (रा. अल्फता चौक, मुकुंदनगर) याने फिर्यादीला फोन करून महापालिकेत तक्रार दिली असून उद्या उपोषणाला बसणार असल्याचे सांगितले. तसेच या भागात बांधकाम करायचे असेल आणि हॉल चालवायचा असेल तर ५ लाख रुपये खंडणी द्यावी लागेल, अन्यथा बांधकाम बंद पाडून तोडायला लावीन, असे म्हणून शिवीगाळ केली.

आरोपीने पैशाची व्यवस्था करण्यासाठी शेख सादीक अल्लाबकश (रा. दर्गादायरा, मुकुंदनगर) याला पाठवत असल्याचे सांगून पैसे न दिल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. फिर्यादीच्या तक्रारीवरून शहबाज जाफर खान आणि शेख सादीक अल्लाबकश या दोघांव्यतिरिक्त अन्य एकाच्या विरोधात खंडणी मागणे व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांनुसार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात करीत आहेत.

# भिंगार परिसरात बनावट विदेशी दारूच्या साठ्यावर पोलिसांचा छापा

## १ लाख ८५ हजारांचा मुद्देमाल जप्त, दोघा जणांवर गुन्हा दाखल

नगर – भिंगारमधील महेशनगर भागातील बाराबाभळी येथे बनावट लेबल लावलेली दारू विक्री करण्याच्या उद्देशाने साठवून ठेवलेल्या ठिकाणी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकून १ लाख ८५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. २ सप्टेंबर रोजी सायंकाळी ही कारवाई करण्यात आली.

अहिल्यानगर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यातील अवैध व्यवसायांवर कडक कारवाई करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिले आहेत. या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी स.पो.नि.भोये व पोलीस अंमलदार संदिप पवार, संतोष खैरे, अमृत आढाव, बाळासाहेब खेडकर व सुनिता पवारएक पथक तयार करून अवैध व्यवसायिकांचा शोध घेण्यासाठी रवाना केले होते. २ सप्टेंबर २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करत असताना, भिंगारमधील महेशनगर भागातील बाराबाभळी येथे एका इसमाने बनावट लेबल लावलेली दारू साठवून ठेवल्याची गोपनीय माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पथकाने पंचासमक्ष नमूद ठिकाणी छापा टाकला. त्यावेळी विजय बलेश्वरसिंह कौशीक (वय ४६, रा. विजयनगर भिंगार) हा इसम तिथे मिळून आला. त्याने ते घर भाड्याने घेतल्याचे सांगितले.



भिंगार मध्ये बनावट दारूचा साठा पकडल्यानंतर आरोपी समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

पंचांसमक्ष घराची झडती घेतली असता, त्या ठिकाणी विदेशी दारू मिळून आली. बॉटलवरील लेबलवर किंमत, बॅच नंबर व उत्पादन तारीख दिलेली नव्हती. दारूच्या बॉटलवर बनावट लेबल लावल्याचे निष्पन्न झाल्याने पोलिसांनी आरोपी विजय कौशीक याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून १ लाख ७५ हजार रुपयांच्या दारूच्या बॉटल्स आणि २० हजार रुपयांचा एक मोबाईल असा एकूण १ लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ताब्यातील आरोपीकडे अधिक चौकशी केली असता, त्याने हा मुद्देमाल त्याचा साथीदार संदीप सानप (रा.मेहकरी, ता. नगर) याच्याकडून घेतल्याची माहिती दिली. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता आणि महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गणेश उत्सवात डीजेचा दणदणाट नको; पदपथ अडविणाऱ्या मंडपांनाही विरोध

नगर – गणेशभक्तीच्या नावाखाली होणारा कर्णकर्कश डीजेचा दणदणाट, प्रचंड क्षमतेच्या ध्वनिवर्धक यंत्रणांचा वापर तसेच संस्कृतीच्या नावाखाली सार्वजनिक रस्ते व पदपथ अडविणाऱ्या मंडपांविरोधात पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद यांनी जनआंदोलनाची घोषणा केली आहे. गणेशोत्सवाला लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी दिलेल्या लोकजागृती, सामाजिक प्रबोधन आणि राष्ट्रीय एकात्मतेच्या मूळ उद्देशाकडे पुन्हा नेण्यासाठी या दोन्ही संघटना लवकरच लोकमान्य राष्ट्रीय गणेशोत्सव आचारसंहिता २०२६ जाहीर करणार आहेत.

या प्रस्तावित जनआचारसंहितेत गणेशोत्सवाच्या काळात डीजे, प्रचंड क्षमतेचे ध्वनिवर्धक तसेच वाहनांवर बसविलेल्या ध्वनिभिंतींना स्पष्टपणे नकार देण्यात येणार आहे. गणेशोत्सव हा भक्ती, सामाजिक प्रबोधन आणि लोकशिक्षणाचा उत्सव असावा; ध्वनीप्रदूषणाची स्पर्धा किंवा शक्तिप्रदर्शनाचे माध्यम होऊ नये, अशी भूमिका संघटनांनी मांडली आहे. सार्वजनिक रस्ते, पदपथ, चौक तसेच रुग्णवाहिका आणि अग्निशमन दलाच्या मार्गांवर मंडप, कमानी, व्यासपीठे किंवा जनरेटर उभारण्यासही संघटनांकडून विरोध केला जाणार आहे. उत्सवासाठी जागेचा वापर करायचा असल्यास नागरिकांची वाहतूक, आपत्कालीन सेवा आणि पादचाऱ्यांची सुरक्षितता यांना कोणत्याही परिस्थितीत बाधा येऊ नये, अशी मागणी करण्यात येणार आहे.

लोकमान्य राष्ट्रीय गणेशोत्सव आचारसंहिता २०२६ ही सुरुवातीला संविधानातील मूलभूत कर्तव्यांवर आधारित राष्ट्रीय नागरिक सनद आणि आदर्श प्रशासकीय संहिता म्हणून जाहीर करण्यात येणार आहे. त्यानंतर केंद्र व राज्य सरकारे, जिल्हाधिकारी, पोलीस प्रमुख तसेच महानगरपालिका आयुक्तांनी गणेशोत्सवाच्या परवानगीच्या अटींमध्ये या तत्त्वांचा समावेश करावा, अशी मागणी करण्यात येणार आहे.

पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. कारभारी गवळी यांनी या संदर्भात भूमिका स्पष्ट करताना म्हटले की, गणेशाला डीजेचा दणदणाट नको; समाजाला ज्ञानाचा प्रकाश हवा. रस्ता हा कोणत्याही मंडळाची जहागिरी नसून जनतेच्या मूलभूत प्रवासस्वातंत्र्याचा मार्ग आहे. लोकमान्यांचा गणेशोत्सव पुन्हा लोकशिक्षणाचा, सामाजिक प्रबोधनाचा आणि संविधाननिष्ठ लोकभक्तीचा उत्सव बनविणे, हीच खरी गणेशसेवा असल्याचे म्हटले आहे.

# वाळकीत भरधाव कारच्या धडकेत वृद्ध जागीच ठार

नगर – अहिल्यानगर ते वाळकी जाणारे रस्त्यावर भरधाव वेगात जाणाऱ्या कारने दिलेल्या धडकेत एक वृद्ध जागीच ठार झाल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बाळाजी उर्फ बाळासाहेब केशव भालसिंग (वय ८५, रा. वाळकी, ता. नगर )असे मयताचे नाव आहे.

याबाबत सुरेश दत्तू भालसिंग (वय ५९, रा. वाळकी, ता. नगर) यांनी या प्रकरणी फिर्याद दिली आहे. १ सप्टेंबर रोजी रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास वाळकी येथील महाराजा हॉटेलसमोर, वाळकी ते अहिल्यानगर जाणाऱ्या रोडवर हा अपघात घडला. मयत बाळाजी उर्फ बाळासाहेब केशव भालसिंग (वय ८५, रा. वाळकी) हे त्यांच्या मोपेड गाडीवरून (क्र. एमएच १६ सीएच ०८५८) जात होते. त्यावेळी सौरभ रामदास तोंडे (रा. पुष्कराज बिल्डिंग, यशवंतनगर, खराडी, पुणे शहर) हा त्याच्या ताब्यातील कार (क्र. एमएच १२, पीटी १९३४) भरधाव वेगात आणि निष्काळजीपणे चालवून घेऊन जात होता.

त्याने भालसिंग यांच्या मोपेड गाडीला डाव्या बाजूने जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात बाळाजी भालसिंग यांच्या डोक्याला व शरीरावर गंभीर दुखापत होऊन त्यांचा मृत्यू झाला, तसेच दोन्ही वाहनांचे नुकसान झाले. या प्रकरणी कारचालक सौरभ राम दास तोंडे याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०६(१), २८१, १२५(अ) (ब), ३२४(४) सह मोटर वाहन कायद्यान्वये नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मनोज मोंढे करीत आहेत.

# एमआयडीसी परिसरात घरातच सुरु होता कुंटणखाना स्थानिक गुन्हे शाखेचा छापा, ३ महिलांची केली सुटका

नगर – एमआयडीसी परिसरात असलेल्या गजानन कॉलनी येथील एका घरात सुरु असलेल्या कुंटणखाण्यावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकत ३ महिलांची सुटका केली असून कुंटणखाना चालविणाऱ्या महिलेला अटक केली आहे. या महीलेवर एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यातील अवैध व्यवसायिकांवर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले होते. या आदेशानुसार प्रशिक्षणार्थी पोलीस उपअधीक्षक कल्पना पवार आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली एक विशेष पथक तयार करून अवैध व्यवसायांचा शोध घेण्यासाठी रवाना करण्यात आले होते.

२ सप्टेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक एमआयडीसी पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करत असताना, गजानन कॉलनी येथील एका घरात महिलाकरवी कुंटणखाना (वेश्याव्यवसाय) चालवला जात असल्याची गोपनीय माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पथकाने पंचासमक्ष खात्री करण्यासाठी एका पोलीस अंमलदाराला बनावट ग्राहक म्हणून त्या ठिकाणी पाठवले. वेश्याव्यवसाय सुरू असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर पथकाने पंचासमक्ष छापा टाकून रजनी प्रभाकर डहाळे (वय ५६, रा. गजानन कॉलनी, एमआयडीसी, अहिल्यानगर) या महिलेला ताब्यात घेतले.

ताब्यातील महिलेच्या घराची झडती घेतली असता त्या ठिकाणी ३ महिला मिळून आल्या. चौकशी केली असता, आरोपी रजनी डहाळे हिने त्यांना वेश्या व्यवसायासाठी आणल्याचे आणि ग्राहकांकडून स्वतः पैसे घेऊन त्यातील काही भाग त्यांना देऊन त्यांच्याकडून बळजबरीने वेश्याव्यवसाय करून घेत असल्याची माहिती समोर आली. पोलिसांनी तत्परतेने कारवाई करत त्या तीन पीडित महिलांची सुटका केली. आरोपी महिला रजनी प्रभाकर डहाळे ही महिलांकडून कुंटणखाना चालवून आपली उपजीविका करत असल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणी तिचेविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात स्त्रिया व मुली यांचे अनैतिक व्यापारास प्रतिबंधक कायदा, १९५६ च्या कलम ३, ४, ५, ७ व ८ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई प्रशिक्षणार्थी पोलीस उप अधीक्षक कल्पना पवार व पो.नि. संतोष मुटकुळे यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे उपनिरीक्षक संदिप दरवडे व पोलीस अंमलदार विकास साळवे, विष्णु भागवत, शाहीद शेख, बिरप्पा करमल, अशोक लिपणे, विजय ठोंबरे व महिला पोलीस अंमलदार चिमा काळे यांच्या पथकाने केली.



अहिल्यानगर साऊंड लाइट जनरेटर असोसिएशनच्या बैठकीत शिवदत्त पांढरे यांनी मार्गदर्शन केले.

# नगरमध्ये गणेशोत्सवात प्लाझ्मा साऊंड, प्रेशरमिड आणि लेझर लाईटला नो एंट्री!

नगर – शासनाचे निर्बंध आणि वारंवार होणाऱ्या कारवायांमुळे आर्थिक अडचणीत सापडलेला साऊंड–लाइट व्यवसाय वाचवण्यासाठी अहिल्यानगर साऊंड लाइट जनरेटर असोसिएशनने अत्यंत कडक पावले उचलली आहेत. नगर शहरातील व्यावसायिकांच्या पार पडलेल्या महत्त्वाच्या बैठकीत, यंदाच्या गणेशोत्सवात प्लाझ्मा साऊंड, प्रेशरमिड आणि धोकादायक लेझर लाईटचा अजिबात वापर न करण्याचा एकमुखाने निर्णय घेण्यात आला आहे. शासकीय नियमांचे काटेकोर पालन करून ध्वनीक्षेपकांमुळे नागरिकांना त्रास होणार नाही, याची पूर्ण खबरदारी या गणेशोत्सवात घेतली जाणार आहे. विशेष म्हणजे, केवळ स्थानिकच नव्हे तर बाहेरगावाहून येणाऱ्या डीजे व्यावसायिकांनाही हे सर्व नियम बंधनकारक असणार असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यासाठी प्रशासनाला पूर्ण सहकार्य केले जाईल, असा सज्जड इशारा असोसिएशनतर्फे देण्यात आला आहे.

या बैठकीला असोसिएशनचे अध्यक्ष शिवदत्त पांढरे, उपाध्यक्ष चेतन अरकल आणि खजिनदार अमीर मुलानी यांच्यासह अमोल करपे, विकास माने, कपिल ढोकणे, रेवण पोवल, साईनाथ पेद्राम, संतोष वाघ आणि दिगंबर भिंगारे हे पदाधिकारी व व्यावसायिक उपस्थित होते.


# बिजलाबाई झावरे यांचे दु:खद निधन



पारनेर – पारनेर तालुका पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष शरद झावरे यांच्या मातोश्री श्रीमती बिजलाबाई भिमाजी झावरे (वय ८०) यांचे ३ सप्टेबर रोजी निधन झाले.

त्यांच्या मागे तीन मुले, एक मुलगी व नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्या धार्मिक व मनमिळावू स्वभावाच्या होत्या. त्यांचा अंत्यविधी दुपारी वासुंदे येथे झाला. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. त्या ज्येष्ठ पत्रकार बबनराव गायके यांच्या भगिनी होत.

# सोपानराव कुलट यांचे हृदयविकाराने निधन



नगर – बुरुडगाव येथील रहिवासी सोपानराव किसनराव कुलट (वय ८५) यांचे ३ सप्टेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सीना नदी काठी बुरुडगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, २ मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. किशोर व अनिल कुलट यांचे ते वडील होत.

# पुष्पाबाई बोरा यांचे दु:खद निधन



नगर – श्रीमती पुष्पाबाई शेषमल बोरा (वय ७८) यांचे २ सप्टेंबर रोजी पहाटे अहिल्यानगर येथे दुःखद निधन झाले. त्यांचे अहिल्यानगर येथील पद्मश्री डॉक्टर विठ्ठलराव विखे पाटील हॉस्पिटल मध्ये देहदान करण्यात आले.

त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्या अत्यंत मनमिळावू स्वभावाच्या होत्या. पुणे येथील दीपक बोरा, ललित बोरा व नगर येथील आशा सुरेंद्र मुथा यांच्या त्या मातोश्री होत.

# भिंगारमध्ये कचरा टाकण्यासाठी येणाऱ्या महिलांसमोर अश्लील चाळे

## त्रस्त महिलांची पोलीस ठाण्यात धाव, विकृत इसमावर कारवाईची मागणी

नगर – भिंगार शहरातील गवळीवाडा परिसरात कचरा टाकण्यासाठी येणाऱ्या महिलांसमोर लघवीचे बहाणे करून अश्लील वर्तन करणाऱ्या एका विकृत इसमाविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची मागणी परिसरातील महिलांनी केली आहे. याप्रकरणी सौ. सविता मारुती पवार यांच्यासह परिसरातील त्रस्त महिलांनी कॅम्प पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार अर्ज दाखल केला आहे.

भिंगारमधील सैनिकनगराजवळ असलेल्या गवळीवाड्यातील पाण्याच्या टाकीजवळ राहणाऱ्या महिलांनी दिलेल्या तक्रारीनुसार सैनिकनगर मध्ये राहणारा संशयित हा भिंगारमधील जॉगिंग पार्कशेजारी गारमेंट अँड टेलर नावाचे दुकान चालवतो. परिसरातील पाण्याच्या टाकीजवळ कचरा कुंडी असून तिच्या बाजूला ’अतुल चायनीज’ नावाचे हॉटेल आहे. हा विकृत इसम दारू पिऊन नॉनव्हेज खाण्यासाठी त्या हॉटेलवर येत असतो आणि तिथून महिलांवर लक्ष ठेवून असतो.

परिसरातील कोणतीही महिला किंवा मुलगी कचरा टाकण्यासाठी आल्यानंतर हा इसम कचरा कुंडीजवळ येऊन लघुशंकेला उभा असल्याचे नाटक करतो. कचरा टाकण्यासाठी येणाऱ्या महिलांचे लक्ष वेधण्यासाठी तो मोठ्याने खाकरून अश्लील शब्द वापरतो आणि वेडेवाकडे हावभाव करतो. या प्रकारामुळे परिसरातील महिला आणि मुलींमध्ये मोठी दहशत निर्माण झाली असून, महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. हा इसम कधीही मोठा अनर्थ घडवून आणू शकतो, त्यामुळे त्याच्यावर त्वरित कठोर कायदेशीर कारवाई करून त्याला जेरबंद करावे, अशी आक्रमक मागणी गवळीवाड्यातील महिलांनी केली आहे.

# वीज चोरी करणाऱ्या तिघांवर गुन्हे दाखल

नगर – भिंगार परिसरात महावितरण कंपनीची वीज चोरी केल्याप्रकरणी कॅम्प पोलिसांनी तीन स्वतंत्र गुन्हे दाखल केले आहेत. या कारवायांमध्ये घरगुती वापरासाठी वीज चोरी केल्याचे समोर आले असून, संबंधित संशयितांविरूध्द भारतीय विद्युत अधिनियम २००३ मधील कलम १३५ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

भिंगार वीज वितरण कार्यालयातील कर्मचारी श्रीनिवास आवंढे (वय ३७) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ही कारवाई करण्यात आली. वीज वितरण कंपनीच्या तपासणीत संबंधित ठिकाणी गेल्या १२ महिन्यांपासून वीज चोरी होत असल्याचे निदर्शनास आले. पहिल्या प्रकरणात जावेद इम्रान शेख (रा. आलमगीर) याने स्वतःच्या घरासाठी महावितरणची ८८६ युनिट वीज चोरी केल्याचे आढळून आले.

दुसऱ्या प्रकरणात आफताब इस्माईल शेख (रा. आलमगीर) याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. त्याने घरगुती वापरासाठी महावितरणची वीज चोरी केल्याचे तपासणीत निष्पन्न झाले. तिसऱ्या प्रकरणातही तय्यब निसार शेख (रा. आलमगीर, अहिल्यानगर) याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात ५१९ युनिट वीज चोरी केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

# अहिल्यानगरच्या कंचन नेहलानींचा ‘लेडी किशोर कुमार’ म्हणून अहमदाबाद, कल्याणमध्ये गौरव

नगर – किशोर कुमार म्हटले की डोळ्यांसमोर उभा राहतो तो त्यांचा खट्याळपणा, मिश्कींल हास्य, भन्नाट एक्सप्रेशन्स, अफलातून बॉडी लँग्वेज आणि आपल्या अभिनयातून प्रेक्षकांना खळखळून हसविण्याची अनोखी शैली. हाच अंदाज हुबेहूब आपल्या अभिनयातून साकारत अहिल्यानगरच्या कंचन नेहलानी यांनी सलग दोन शानदार कार्यक्रमांमध्ये रसिकांची मने जिंकली. किशोर कुमार यांच्या व्यक्तिमत्त्वाची अनोखी झलक सादर केल्यामुळे त्यांना अहमदाबाद आणि कल्याण येथे विशेष सन्मानाने गौरविण्यात आले.



कंचन नेहलानी यांच्या या अनोख्या सादरीकरणाची सुरुवात अहमदाबाद येथे झालेल्या ‘हॅप्पी फेस्ट’ या कार्यक्रमातून झाली. मिस इंडिया कॉन्टिनेंटल सुमन चैलानी यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात कंचन यांनी ‘मेरे सामने वाली खिडकी’ या लोकप्रिय गीतावर किशोर कुमार यांच्या खास अंदाजात सादरीकरण केले. गीत सुरू होताच कंचन यांनी किशोर दांच्या शैलीतील देहबोली, चेहऱ्यावरील मिश्कीशल भाव आणि खट्याळ हालचाली सादर करत वातावरणात उत्साह निर्माण केला.

अहमदाबादनंतर कल्याण येथे महाराष्ट्र राज्य सिंधी अकादमी आणि रोशनी कमल फाउंडेशन यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ‘तीज जश्नय’ या कार्यक्रमात कंचन नेहलानी यांनी पुन्हा एकदा आपल्या खास अंदाजाची झलक दाखविली. यावेळीही ‘मेरे सामने वाली खिडकी’ या गीताची निवड करण्यात आली. त्यांच्या कॉमिक टाइमिंगमुळे आणि सहजसुंदर अभिनयामुळे कार्यक्रमस्थळी हास्याचे फवारे उडाले.त्यामुळेच कार्यक्रमातील रसिकांनी कंचन यांच्या या अनोख्या प्रयोगाचे विशेष कौतुक केले.

किशोर कुमार यांच्या अजरामर गाण्यांना आणि त्यांच्या सदाबहार व्यक्तिमत्त्वाला आपल्या अभिनयातून वेगळ्या पद्धतीने अभिवादन करण्याचा कंचन यांचा हा प्रयत्न रसिकांच्या पसंतीस उतरला आहे. विशेषतः त्यांच्या सादरीकरणातील विनोद आणि सहजता यामुळे प्रेक्षकांना किशोर दांच्या जुन्या आठवणींमध्ये रमण्याची संधी मिळाली. किशोर दांचा अंदाज तोच, मस्ती तीच आणि एक्सप्रेशन्सही तसेच; फरक एवढाच की यावेळी मंचावर किशोर कुमार नव्हे, तर त्यांच्या अंदाजाची ‘लेडी किशोर कुमार’ म्हणून कंचन नेहलानी अवतरल्या होत्या.

# मदर टेरेसांच्या मानवसेवेच्या वाटेवर चालणाऱ्या बुथ हॉस्पिटलमधील डॉक्टर-परिचारिकांचा सन्मान

नगर – संत मदर टेरेसा यांच्या जन्मदिनानिमित्त बुथ हॉस्पिटल येथे रुग्णांची अहोरात्र सेवा करणाऱ्या डॉक्टर, रुग्णसेविका आणि परिचारिकांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. रुग्णसेवेच्या माध्यमातून मानवतेची सेवा करणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शाहू – फुले– आंबेडकर – साठे – कलाम सामाजिक विचार मंच आणि उषा सामाजिक संस्थेच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला.



संत मदर टेरेसा यांच्या जन्मदिनानिमित्त बुथ हॉस्पिटलमधील कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला.

कोरोना महामारीच्या काळात बुथ हॉस्पिटलने रुग्णसेवेत महत्त्वपूर्ण योगदान देत अनेक रुग्णांना उपचार देऊन जीवदान देण्याचे कार्य केले. या रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिका आणि रुग्णसेविका निःस्वार्थ भावनेने रुग्णांची सेवा करीत आहेत. त्यांच्या या समर्पित कार्याचा गौरव करण्याच्या उद्देशाने मदर टेरेसा यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून हा विशेष सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला. मदर टेरेसा यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजातील गरजू, दुःखी, निराधार आणि आजारी व्यक्तींच्या सेवेसाठी वाहून घेतले. त्यांच्या मानवतावादी कार्यातून प्रेरणा घेत रुग्णांची सेवा करणाऱ्या डॉक्टर, परिचारिका आणि रुग्णसेविकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा उपक्रम घेण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

संस्थेचे अध्यक्ष अशोक शिंदे म्हणाले, रुग्णांची सेवा ही केवळ नोकरी किंवा कर्तव्य नसून ती मानवतेची सेवा आहे. एखाद्या गरजू व्यक्तीच्या वेदना कमी करण्यासाठी आपण सातत्याने काम केले, तर त्यातून खऱ्या अर्थाने मानवसेवा घडते. सेवा सातत्यपूर्ण आणि निःस्वार्थ भावनेने केली, तर त्यातच जीवनाचे खरे समाधान मिळते आणि देवाची सेवा केल्याचे पुण्यही प्राप्त होते. मदर टेरेसा यांनी संपूर्ण जगाला मानवसेवेचा हाच मार्ग दाखवून दिल्याचे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र शासनाचा साहित्यरत्न लोकशाहिर डॉ. अण्णा भाऊ साठे पुरस्कार प्राप्त डॉ. सुनील सकट यांची कार्यक्रमाला विशेष उपस्थिती होती. त्यांनी माणसाची सेवा हीच खरी ईश्वरसेवा असल्याचे स्पष्ट केले. बुथ हॉस्पिटलमधील डॉक्टर, परिचारिका आणि रुग्णसेविकांच्या कार्याचे कौतुक केले. रुग्णांच्या सेवेत कार्यरत असलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या सेवाभावाला शुभेच्छा देत मानवसेवेचे हे कार्य असेच सुरू राहावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

या उपक्रमातून रुग्णसेवकांच्या कार्याचा गौरव करण्याबरोबरच समाजात मानवतेचा संदेश देण्यात आला. आजारपण, वेदना आणि संकटाच्या काळात रुग्णांच्या पाठीशी उभे राहणारे डॉक्टर, परिचारिका आणि रुग्णसेविका हे आरोग्य व्यवस्थेतील महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. त्यांच्या समर्पित सेवेला सलाम म्हणून हा उपक्रम राबविण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले. यावेळी बुथ हॉस्पिटलचे प्रशासक मेजर सुरेश चोपडे, सहाय्यक प्रशासक मेजर हेलन चोपडे, डॉक्टर शितल शिंदे, मेजर बाबासाहेब थोरात, मेजर भारती थोरात, परिचारिका मुख्याध्यापिका मलिका साबळे, सोनिया थोरात, निकिता केदारी, अमोल देशमुख, सुनीता पारखे, अमित पठारे, निर्मला वाघमारे, वैद्यकीय सोशल प्रवीण साबळे आदी उपस्थित होते.

# प्रेरणादायी अक्षरधन

## सुखदुःखाची पाठशिवणी चालू

“मुसाफिर”
वाचनीय मननीय
संकलन: दिशान फिचर्स




सुख मागून मिळत नाही, दयाळू, परोपकारी, सुजनदातादेखील कुणाच्या झोळीत सुख टाकू शकत नाही. दुःखाचेदेखील तसेच आहे. ते नको म्हटल्याने टळत नाही. कुणी देतो म्हटले, तरी ते त्याला देता येत नाही. कारण सुख, दुःख ही देण्याघेण्याची वस्तू नाही. त्याने सुख दिले किंवा दुःख दिले, ही मानण्याची बाब आहे. सुख, दुःख हा मनाचा भाव आहे. मनाच्या असमतोलपणाचे ते प्रदर्शन आहे. म्हणूनच घटकेत सुख, तर पाठोपाठच दुःख जाणवत आलेले आहे. एखाद्या चाकाचे अरे आता वर तर लगेच खाली जातात. तसेच सुखदुःखाची पाठशिवणी सुरु असते. पण चाक स्थिर झालेले मन, ना सुखाचा धनी ना कधी दुःख मानी.

पण चंचलतेलाच तर मन म्हणतात. मग सुरुच राहणार सुखदुःखाचा घाणा, माणूस सुखाने लगेच मोहरतो, तर दुःखाने त्वरित करपतो.

कुणाला एकसारखे सुख लाभले आहे किंवा सतत दुःखच भोवले आहे? चाकाच्या आऱ्यांप्रमाणे माणसाची अवस्था खाली वर होते. कधी सुखावर आरु, तर कधी दुःखापायी चूर.

सुखाची चटक लागली, की दुःखाच्या कल्पनेचे ही चटके बसायला लागतात. छू मंतर करुन घातली फुंकर, की लहान मुलेदेखील दुखणे विसरुन सुखाच्या केवळ आशेनेही रडता रडता हसतात.

एकदा बिरबल दुरदेशी जाणार होता. त्याच्या कुटुंबियांनी आपापल्या आवडत्या वस्तू आणायला सांगितल्या. मित्रांनीदेखील नव्या नव्या, निव्वळ आपल्याकडेच लोकांना पाहायला मिळतील अशा वस्तू फर्मावल्या. मग बिरबल बादशाहकडे गेला. बादशहा बिरबलाला म्हणाला, माझ्यासाठी अशी वस्तू आण, की जी पाहताच सुखी माणूस लगेच दुःखी होईल आणि दुःखी माणूस सुखी.

बिरबल दुरदेशातून परतला. ज्याला त्याला ज्याची वस्तू त्याने दिली. बादशहाने सांगितलेली आणली की नाही पण ? सगळ दरबार उत्सुकतेने पाहू लागला. बादशहा बिरबरलाला मागितलेली वस्तू दाखव म्हणाला दरबारात. बिरबलाने एक पाटी आणली होती. लाकडाची. तिच्यावर लिहिले होते. आज आहे ते उद्या राहणार नाही. आणि या कल्पनेनेच सुखी हळहळले, तर दुःखी हुरळले. दुःखाचे ढग विरुन जातील. सदा हसण्याची सवय मात्र पाहिजे.

– किशोर गांधी

# अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून छेडछाड; तरुणावर गुन्हा दाखल

नगर – नगर तालुक्यातील राळेगण म्हसोबा येथे एका सतरा वर्षीय अल्पवयीन मुलीचा मोटारसायकलवरून पाठलाग करून तिचा विनयभंग केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात शुभम अशोक लोखंडे (रा. राळेगण म्हसोबा) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

संशयित आरोपी शुभम लोखंडे हा मागील पाच ते सहा महिन्यांपासून अल्पवयीन मुलीचा मोटारसायकलवरून सातत्याने पाठलाग करत होता. २४ ऑगस्ट रोजी दुपारी दोन ते तीन वाजेच्या सुमारास त्याने मुलीचा हात पकडून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले.

तसेच संशयिताने त्याच्या मोबाईलवरून मुलीच्या नातेवाइकांच्या मोबाईलवर संपर्क साधून ‘तू मला आवडतेस, माझ्यासोबत फिरायला चल’ असे म्हणत वारंवार त्रास दिला.

अखेर पीडित मुलीने दिलेल्या तक्रारीवरून नगर तालुका पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण कायद्यान्वये (पॉक्सो) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गजेंद्र इंगळे करत आहेत.

# शिष्यवृत्ती परीक्षेत भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे घवघवीत यश

## राज्य गुणवत्ता यादीत कल्याणी गदादे चौथी; ६१ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र

नगर – महाराष्ट्र शासनातर्फे इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलने उल्लेखनीय यश संपादन केले. विद्यालयातील एकूण १०७ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी कल्याणी भाऊसाहेब गदादे हिने राज्य गुणवत्ता यादीत चौथा क्रमांक, तर जिल्हा गुणवत्ता यादीत दुसरा क्रमांक मिळवत विद्यालयाच्या शैक्षणिक यशात मानाचा तुरा रोवला.

याचबरोबर जाधव सान्वी शरद, म्हस्के आशुतोष राजू, ठाणगे तेजल जयवंत, कासार ऋत्विक बाळासाहेब, क्षीरसागर अजिंक्य निलेश, जोशी श्रीअंश महेश, लाड श्रेयस भाऊसाहेब, निमसे दुर्वा दत्तात्रय, गुंड पुनम देविदास, भवर जीविका प्रशांत, वांद्रे अनन्या विनायक, कंठाळे आर्यन अजिनाथ आणि गायके आराध्या सागर या १४ विद्यार्थ्यांनी जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळविले. तर विद्यालयातील एकूण ६१ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेसाठी पात्र ठरले आहेत.



शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळविणारे भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक.

विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, उपाध्यक्ष अशोक मुथा, सहकार्यवाह गौरव फिरोदिया आणि खजिनदार प्रकाश गांधी यांनी यशस्वी विद्यार्थी, पालक तसेच मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन करून विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

प्राचार्य कैलास साबळे, उपप्राचार्य निलेश भालेराव, पर्यवेक्षिका रेणुका परदेशी, नीलिमा शिंदे आणि पर्यवेक्षक बाळासाहेब पाटील यांच्या नियोजनानुसार अध्यापकांनी वर्षभर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांकडून नियमित सराव पेपर सोडवून घेण्यात आले. प्रतिभा भागवत, राधिका पंचारिया, राजेंद्र उगले, वैशाली मेहेर, यशश्री कुलकर्णी, सतीश गुगळे आणि दीपेश ओस्तवाल यांनी विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले. निमंत्रक म्हणून अर्चना आळकुटे यांनी कामकाज पाहिले.



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बाबुर्डी घुमट येथील उपकेंद्रात क्षेत्र भेटीसाठी आलेले विद्यार्थी.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या उपकेंद्रात रमले शालेय विद्यार्थी

## एकदिवशीय क्षेत्र भेटअंतर्गत वाळकी येथील न्यू इंग्लिश स्कूलचा उपक्रम

नगर – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बाबुर्डी घुमट येथील उपकेंद्रात वाळकी येथील न्यू इंग्लिश शाळेतील प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील २६५ विद्यार्थ्यांनी एकदिवशीय क्षेत्र भेटअंतर्गत संपूर्ण दिवसभर विद्यापीठाच्या शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजाची जवळून माहिती जाणून घेतली.

विद्यापीठाच्या अहिल्यानगर उपकेंद्राचे सहायक कुलसचिव डॉ. शिवप्रसाद घालमे यांनी विद्यार्थ्यांना माहिती देताना सांगितले की, पालक व विद्यार्थी यांची अनेक दिवसांपासूनची मागणी लक्षात घेऊन १९८६ मध्ये नगरपालिकेच्या एका छोट्या गाळ्यात उपकेंद्र स्थापन झाल्याचे सांगितले. त्यानंतर या उपकेंद्राचा विस्तार वाढत गेल्याने अधिकच्या जागेचा शोध घेऊन २०१२ मध्ये बाबूर्डी घुमट येथील ८३ एकर शासकीय जमिनीचे हस्तांतरण झाल्याने मे २०२४ पासून येथील नूतन इमारतीमधूनच जिल्ह्यातील महाविद्यालयांचे विद्यापीठाशी समन्वय साधण्याचे काम होत आहे. शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून बी. एससी. डाटा सायन्स हा चार वर्षीय पदवी अभ्यासक्रम यशस्वीपणे सुरू असून याचा परिसरातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना लाभ होत असल्याचा आवर्जून उल्लेख केला. तसेच त्यांनी येथून सुरू असलेल्या प्रशासकीय कामकाजाची सविस्तरपणे माहिती दिली.

बी.एससी.डाटा सायन्स अभ्यासक्रमाचे सहायक प्राध्यापक डॉ. बी. के. थोरवे यांनी करिअरसाठी बी. एससी. डाटा सायन्स हा उत्तम अभ्यासक्रम असल्याचे मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी कुतूहलापोटी विचारलेल्या सर्व प्रश्नांची विद्यापीठ प्रशासनातील वरिष्ठ सहायक डी. एस. लोंढे, कनिष्ठ सहायक एस. एस. चोरमले व एस. जे. गिऱ्हे या कर्मचाऱ्यांनी अतिशय उत्साहाने उत्तरे दिली. विद्यार्थ्यांनी संपूर्ण दिवसभर सर्व प्रशासकीय व शैक्षणिक कामकाज, संगणक कक्ष, ग्रंथालय, विद्यार्थी सुविधा केंद्र, उत्तरपत्रिका गोदाम कक्ष व परीक्षा नियंत्रण कक्षातील कामकाजाची बारकाईने माहिती घेतली. शाळेतील सर्व शिक्षकांनी क्षेत्र भेटीसाठी सहकार्य केल्याबद्दल विद्यापीठ प्रशासनाचे आभार मानले. शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांचे स्वागत प्रा. पी. एस. मेटकर यांनी केले. प्रा. गायत्री कर्पे यांनी आभार मानले.



नर्मदेश्वर महादेव मंदिर उत्सवानिमित्त मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली.

# नर्मदेश्वर महादेव मंदिर उत्सवानिमित्त मोफत आरोग्य तपासणी; रक्त, थायरॉईड, क्षयरोग तपासणीसह एक्स–रे व औषध वाटप

नगर – कल्याण रोड येथील अनुसयानगर परिसरातील नर्मदेश्वर महादेव मंदिर उत्सवानिमित्त अहिल्यानगर महानगरपालिका आरोग्य विभाग व ॲड. युवराज शिंदे यांच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी व औषध उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी, रक्त तपासणी, थायरॉईड तपासणी, क्षयरोग तपासणी तसेच एक्स–रे तपासणी करण्यात आली. त्याचबरोबर गरजेनुसार नागरिकांना मोफत औषधांचे वाटप व औषधोपचार करण्यात आले.

यावेळी ॲड. युवराज शिंदे म्हणाले की, सण, उत्सव तसेच वाढदिवस साजरे करत असताना प्रत्येकाने सामाजिक बांधिलकी जोपासून समाजासाठी उपयुक्त उपक्रम राबविणे गरजेचे आहे. सर्वसामान्य नागरिकांना आपल्या आरोग्याची तपासणी करून घेता यावी आणि आजारांचे वेळीच निदान होऊन योग्य उपचार मिळावेत, यासाठी मोफत आरोग्य तपासणी व औषध वाटप शिबिरे आयोजित करणे ही काळाची गरज बनली आहे. मोफत आरोग्य तपासणी शिबिराच्या माध्यमातून सर्वसामान्य कुटुंबातील नागरिकांना आपल्या आरोग्याची तपासणी करून घेता येते. अनेक आजारांचे वेळेत निदान होणे आवश्यक असते. त्यामुळे अशा शिबिरांचा नागरिकांना मोठा फायदा होतो. श्रावणी तिसऱ्या सोमवारनिमित्त अनुसया नगर परिसरातील नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेत आपल्या आरोग्याची तपासणी करून घेतली.

या प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते सुधाकर बोल्ली, रवींद्र मंडलिक, शेषराव आगळे, दत्तात्रेय मुत्याल, गणेश बेरड, राजू पाटोळे, डॉ. स्मिता म्हस्के, डॉ. गौरव देशमुख, डॉ. ऋतुजा रणदिवे, वर्षा कुलथे, राज्यश्री धोंगडे, कविता लाहोर, विकास गीते, अमोल लांडे, छाया खराडे आदी उपस्थित होते.

# गोरक्षनाथ कराळे यांची ड्रायव्हर सेवा ट्रस्टच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी निवड



नगर– नगर तालुक्यातील पोखर्डी येथील गोरक्षनाथ कराळे यांनी सुरुवातीपासून वाहनांच्या आणि वाहन चालकांच्या प्रश्नांवर सातत्याने लढा दिला.आता त्यांच्यावर समाजसेवक ड्रायव्हर सेवा ट्रस्ट (इंडिया)च्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष पदाची महत्वपूर्ण जबाबदारी देऊन नियुक्ती करण्यात आली आहे.

कराळे यांनी आपल्या सामाजिक कार्याची सुरुवात जय संघर्ष वाहन चालक–मालक संघटनेच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष पदापासून केली. त्यानंतर त्यांनी जन सेवा ड्रायव्हर पार्टीच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष पदाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. वाहन चालकांच्या हक्क व हितासाठी, तसेच विविध प्रलंबित मागण्यांसाठी त्यांनी अनेक मोर्चे, आंदोलने आणि उपोषणे करून चालकांना न्याय मिळवून दिला आहे. त्यांच्या या प्रदीर्घ सामाजिक अनुभवाची आणि उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन ड्रायव्हर सेवा ट्रस्ट (इंडिया) चे अध्यक्ष प्रवीण तिवारी, महाराष्ट्राचे अध्यक्ष गोरख कल्हापुरे तसेच ट्रस्टचे वरिष्ठ पदाधिकारी यांच्या सर्वानुमते कराळे यांची महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी निवड केली आहे.

आपल्या नियुक्तीबद्दल बोलताना कराळे म्हणाले, वाहनांच्या आणि वाहन चालकांच्या विविध समस्या सोडवून, गरजूंना तातडीने मदत पोहोचवणे आणि रस्त्यांवर होणाऱ्या अपघातातील बाधितांना वेळेत हॉस्पिटलमध्ये दाखल करून त्यांचे प्राण वाचवणे, हे मी माझे प्राथमिक कर्तव्य मानतो. नवीन जबाबदारीच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रातील वाहन चालकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्यांच्या प्रश्नांसाठी, कल्याणासाठी आणि विविध कल्याणकारी योजना राबवण्यासाठी काम करीत राहीन, असे सांगितले.

# मिरची मर्चंटस्च्या वार्षिक सभेत भजनांचा गोडवा

२ सप्टेंबर रोजी अ.नगर मिरची मर्चंटस् पतसंस्थेच्या रजत महोत्सवी वर्षाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत गेलो आणि एक सुखद गोडवाही भजन संध्येच्या रुपाने अनुभवता आला.

सप्टेंबर आला की विविध सहकारी बँका आणि पतसंस्थांच्या वार्षिक सर्वसाधारण सभांची पर्वणी असते. सामान्यतः यानिमित्ताने सभासदांना आपल्या संचालक मंडळास प्रश्नोत्तराच्या रुपाने शंकासमाधान व संवाद साधता येतो. अशा सभांमध्ये बहुसंख्य सत्ताधारी समर्थक मोजके नेमके अभ्यासपूर्ण प्रश्न विचारणारे सभासद असतात.

मिरची मर्चंट पतसंस्थेच्या कालच्या वार्षिक सभेत नेहमीच्या नियमांतर्गत कार्यपद्धतीनुसार खेळीमेळीत कामकाज झाले. विशेष म्हणजे सारेच संचालक युवा व नव्या पिढीचे आहेत. मर्चंटस् बँक म्हटलं की हस्तीमलजी मुनोत, शहर बँक म्हटले की घैसास, सुभाष गुंदेचा, रामकृष्ण पतसंस्था म्हणजे श्रीगोपाल धूत, दिनदयाळ पतसंस्था म्हटलं की वसंत लोढा इ. तसेच मिरची मर्चंटस् पतसंस्था म्हणजे मनियार कुटुंबाचे नाव लक्षात राहते कै. मेघराज मनियार यांची मुहूर्तमेढ केल्यानंतर आता त्या परिवाराची तिसरी पिढी कार्य करीत आहे.



मिरची मर्चंट पत संस्थेच्या रौप्य महोत्सवी वार्षिक सभेत आंतरराष्ट्रीय कोर्फ बॉल खेळाडू दिशान गांधी याचा चेअरमन गोविंद मनियार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. (छाया : अमित अनेचा)

कोणतीही आर्थिक संस्था व तिचे नाव प्रतिष्ठा पदाधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रामाणिकता, निष्ठेवर अवलंबून असते. ठेवी व उलाढालींच्या आकारापेक्षा नीतीला महत्त्व असते.

ज्या आर्थिक संस्थेत योग्य नफा, रिझर्व्ह सरप्लस आहे आणि थकबाकी व बुडीत कर्जे किमान असतात त्या संस्थांचा पाया भक्कम ठरतो. या पतसंस्थेच्या बॅलन्सशीटचे आकडे पाहता ते समाधानकारक आहेत. अशा विविध सहकारी बँका व पतसंस्था समाजाच्या त्या त्या क्षेत्रात आर्थिक स्तंभ असतात व त्यामुळे एकूणच त्या भागासह देशाच्या अर्थव्यवस्थेला हातभार लावतात.

सामान्यत: गडबडगोंधळ, वादविवाद होणाऱ्या अनेक पतसंस्थांच्या / बँकांच्या वार्षिक सभेपेक्षा मिरची मर्चंटस् पतसंस्थेची ही सभा लक्षणीय वाटली. यात स्थानिक कलाकार व सभासदांच्या कलागुणांना वाव देऊन अवीट भजनादी गीतांची मेजवानी भोजनाच्या आस्वादासह मिळाली. आर्थिक पाया बळकट करणाऱ्या युवा संचालकांचे अभिनंदन व शुभेच्छा देताना हा पायंडा इतर पतसंस्थांना पाडता येईल असे वाटले.

# घनकचरा विभागातील मनुष्यबळाचे नियोजन संशयाच्या भोवऱ्यात

## मनपाचे कर्मचारी इतर विभागांत, कचरा संकलन खासगी ठेकेदारांकडे



नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाशी संबंधित मनुष्यबळात वारसाहक्क व अनुकंपा तत्त्वावरील नियुक्त्यांमुळे वाढ होत असताना, या कर्मचाऱ्यांच्या वेतनावर महानगरपालिकेच्या तिजोरीतून मोठ्या प्रमाणात खर्च केला जात आहे. मात्र, दुसरीकडे शहरातील कचरा संकलनाचे काम खासगी ठेकेदारामार्फत करून घेण्यासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च सुरूच आहे. त्यामुळे महानगरपालिकेकडे कर्मचारी उपलब्ध असताना कचरा संकलनासाठी खासगी ठेकेदाराची आवश्यकता नेमकी का आहे, असा गंभीर प्रश्न कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायत, अहिल्यानगरचे जिल्हा समन्वयक विकास भाऊसाहेब उडानशिवे यांनी उपस्थित केला आहे.

घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी नियुक्त अथवा उपलब्ध झालेल्या वारसाहक्क व अनुकंपा तत्त्वावरील काही कर्मचाऱ्यांना प्रत्यक्षात बांधकाम विभाग तसेच पाणीपुरवठा विभागात कामासाठी पाठविले जात असल्याची माहिती समोर येत असल्याचा दावा उडानशिवे यांनी केला आहे. त्यामुळे घनकचरा व्यवस्थापनासाठी उपलब्ध असलेल्या मनुष्यबळाचा नेमका वापर कुठे आणि कशासाठी केला जात आहे, याबाबत महानगरपालिकेने पारदर्शकपणे माहिती जाहीर करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

महानगरपालिकेच्या सेवेत कर्मचारी संख्या वाढत असताना त्यांच्या वेतनासाठी सार्वजनिक निधीतून खर्च होत आहे. मात्र, त्याचवेळी शहरातील कचरा संकलनासाठी खासगी ठेकेदाराला स्वतंत्रपणे कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जात असल्यास ही दुहेरी आर्थिक व्यवस्था का निर्माण झाली आहे, याचा खुलासा प्रशासनाने करणे गरजेचे आहे. जर घनकचरा व्यवस्थापन विभागाशी संबंधित कर्मचारी इतर विभागांमध्ये कार्यरत केले जात असतील, तर त्यानंतर घनकचरा व्यवस्थापन विभागात मनुष्यबळाची कमतरता निर्माण होत असल्याचे कारण पुढे करून खासगी ठेकेदारामार्फत कचरा संकलन सुरू ठेवले जात आहे का, असा प्रश्नही उडानशिवे यांनी उपस्थित केला आहे.

महानगरपालिकेने उपलब्ध मनुष्यबळाचे योग्य नियोजन करून त्यांचा त्यांच्या मूळ कामासाठी वापर करणे आवश्यक आहे. कर्मचारी उपलब्ध असताना त्यांना इतर विभागांत पाठवून त्याच कामासाठी बाह्य यंत्रणेला कोट्यवधी रुपयांचा ठेका देणे योग्य आहे का, याचा आर्थिक तसेच प्रशासकीय पातळीवर पुनर्विचार करण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले आहे. विकास उडानशिवे यांनी महानगरपालिका प्रशासनासमोर अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. तसेच घनकचरा व्यवस्थापन विभागात सध्या प्रत्यक्ष कचरा संकलनाच्या कामासाठी किती महानगरपालिका कर्मचारी उपलब्ध आहेत, या कर्मचाऱ्यांच्या वेतनावर दरवर्षी किती खर्च होतो आणि खासगी कचरा संकलन ठेकेदारावर दरवर्षी किती रक्कम खर्च केली जाते, याचा संपूर्ण तपशील नागरिकांसमोर ठेवावा, अशी मागणी करण्यात आली आहे. एकीकडे महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनावर सार्वजनिक निधी खर्च होत असताना, दुसरीकडे त्याच स्वरूपाच्या कामासाठी खासगी ठेकेदारावर मोठ्या प्रमाणात खर्च होत असेल, तर या आर्थिक नियोजनाचा फेरआढावा घेणे आवश्यक असल्याचे उडानशिवे यांनी म्हटले आहे.

महानगरपालिकेचे कर्मचारी वाढले, त्यांच्या वेतनावरील खर्च वाढला; तरीही कचरा संकलनाचे काम खासगी ठेकेदारामार्फतच का करून घेतले जात आहे? या प्रश्नाचे उत्तर प्रशासनाने द्यावे, अशी मागणी उडानशिवे यांनी केली आहे.



पिंपळगाव रोठा येथील जय मल्हार विद्यालयात दप्तरमुक्त शाळा उपक्रम राबविण्यात आला.

# दप्तरमुक्त शिक्षणाचा जय मल्हार विद्यालयात अनोखा उपक्रम

नगर – पिंपळगाव रोठा येथील जय मल्हार विद्यालयात २ सप्टेंबर रोजी दप्तर मुक्त शाळा हा अनोखा उपक्रम राबविण्यात आला. दप्तराचे ओझे कमी करून संस्कारक्षम तसेच इतर उपक्रमाद्वारे हा दिवस साजरा करण्यात आला.

सुरुवातीला इयत्ता दहावीच्या विद्यार्थिनींनी परिपाठ सादर केला. श्रावणी मुळे हिने उत्कृष्ट सूत्रसंचालन करून परिपाठाचे नियोजन केले. नंतर सर्व विद्यार्थिनींनी विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना राख्या बांधल्या.

यानंतर विद्यालयाचे मुख्याध्यापक बी. आर. उंडे यांनी बैठे व उभे राहून कवायत घेतली. यात सर्व विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. नंतर योगासन व आनापान ही कृती घेण्यात आली. अनापान म्हणजे श्वासाच्या नैसर्गिक हालचालीकडे शांतपणे लक्ष देणे होय. आनापांचा मंत्र श्वासावर लक्ष मनात शांतता यानुसार विद्यार्थी ध्यानधारणेमध्ये बसून केवळ श्वासाकडे लक्ष देऊन ही कृती अत्यंत संयमाने करत होते. मनाची एकाग्रता झाल्याशिवाय स्मरणशक्ती वाढत नाही, असे मार्गदर्शन बी. एस. गरकळ यांनी यावेळी केले. वाचाल तर वाचाल या संकल्पनेप्रमाणे आठवी, नववी व दहावी विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील पुस्तके वाचण्यासाठी दिली गेली. आठवीचे वर्गशिक्षक जरांगे, नववीचे वर्गशिक्षक केदारी व दहावीचे वर्गशिक्षक गरकळ यांनी वर्गानुसार पुस्तक वितरण करून विद्यार्थ्यांना पुस्तक वाचण्यासाठी दिले व त्यांचे वाचन घेतले.

मुख्याध्यापक बी. आर. उंडे, जेष्ठ शिक्षक जरांगे, गरकळ, केदारी, ग्रंथालय प्रमुख भगवान भांबरे, संतोष घुले, नारायण पुंडे, गौरी जगताप व छाया केदारे यांनी उत्कृष्ट नियोजन करून दप्तर मुक्त शाळा हा उपक्रम यशस्वीरित्या पूर्ण केला.

# अभियंता सागर ससाणे यांच्या तांत्रिक पुस्तकाचे लोकार्पण

नगर – अभियंता सागर श्रीकांत ससाणे लिखित शाश्वत अंतर्गत ज्वलन इंजिनांसाठी प्रगत ज्वलन तंत्रज्ञान या तांत्रिक पुस्तकाचे मान्यवरांच्या उपस्थितीत लोकार्पण करण्यात आले.या पुस्तकाचे प्रकाशन एम व्ही ई व्यवसाय प्रमुख रूपेश एस. राजहंस, प्लांट हेड अमित लाखे, धनंजय कुलकर्णी आणि राजेंद्र नाईकवाडी यांच्या हस्ते संपन्न झाले.



अभियंता सागर ससाणे लिखित शाश्वत अंतर्गत ज्वलन इंजिनांसाठी प्रगत ज्वलन तंत्रज्ञान या तांत्रिक पुस्तकाचे प्रकाशन करताना अमित लाखे, धनंजय कुलकर्णी, लेखक अभियंता सागर ससाणे, रूपेश एस. राजहंस आदी.

यावेळी मान्यवरांनी उद्योग क्षेत्रातील अनुभव आणि शैक्षणिक ज्ञान यांचा संगम घडवून आणणाऱ्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले. अंतर्गत ज्वलन इंजिन विषयातील आधुनिक तंत्रज्ञान, शाश्वत विकास आणि अभियंत्रिकी क्षेत्रातील नव्या संकल्पनांवर आधारित हे पुस्तक विद्यार्थ्यांसह प्राध्यापक, संशोधक आणि अभियंत्यांसाठी मार्गदर्शक ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

गेल्या दोन दशकांपासून विद्युत उद्योग क्षेत्रात कार्यरत असलेल्या अभियंता सागर ससाणे यांची शैक्षणिक पार्श्वभूमी यांत्रिकी अभियांत्रिकीची असून, अभियांत्रिकी शिक्षणासाठी योगदान देण्याच्या उद्देशाने त्यांनी हे पुस्तक लेखन केले आहे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक अभ्यासक्रमासोबतच प्रत्यक्ष औद्योगिक अनुभवाची जोड मिळावी, या हेतूने या पुस्तकाची निर्मिती करण्यात आली आहे. अरविंद परगावकर (माजी उपाध्यक्ष, श्नायडर इलेक्ट्रिक) श्रीकांत गाडे यांनीही सागर ससाणे यांचे अभिनंदन केले.

# ‘पद्मशाली फाउंडेशन’च्यावतीने आयोजित महाप्रसादाचा भाविकांनी घेतला लाभ

नगर – श्रावण महिन्यातील तिसऱ्या सोमवारनिमित्त पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने नेप्ती नाका येथील श्री मार्कंडेय शैक्षणिक संकुलात आयोजित महाप्रसाद भंडाऱ्याचा अनेक भाविकांनी लाभ घेतला. महर्षी श्री मार्कंडेय महामुनी यांच्या महाआरतीने महाप्रसादाची सुरुवात करण्यात आली.



तिसऱ्या सोमवारनिमित्त आयोजित महाप्रसादाचा लाभ घेताना भाविक.

यावेळी अजय म्याना, गोपाल मंगलारप व सुशांत जाधव यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. महाप्रसादाच्या ठिकाणी आकर्षक सजावट करण्यात आली होती. नंदीवर विराजमान झालेली भगवान महादेवांची आकर्षक मूर्ती भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेत होती. तसेच महर्षी श्री मार्कंडेय यांची सुंदर मूर्तीही याठिकाणी ठेवण्यात आली होती.

यंदाच्या महाप्रसादाचे विशेष आकर्षण ठरले ते पद्मशाली समाजातील प्रसिद्ध पप्पू बुवाचे. पप्पू म्हणजे वरण, बुवा म्हणजे भात आणि त्यासोबत शिरा असा पारंपरिक महाप्रसाद भाविकांसाठी ठेवण्यात आला होता. या पारंपरिक महाप्रसादाचा भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घेतला. धार्मिक वातावरणात पार पडलेल्या या महाप्रसादामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. महाप्रसाद यशस्वी करण्यासाठी पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टच्या कार्यकर्त्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने विशेष परिश्रम घेतले.

पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टच्या माध्यमातून वर्षभर विविध सामाजिक व सेवाभावी उपक्रम सातत्याने राबविले जातात. यामध्ये गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप, गरजू व आर्थिक अडचणीत असलेल्या व्यक्तींना मदत, मोफत आरोग्य व इतर शिबिरांचे आयोजन, वृक्षारोपण, रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर तसेच विविध सामाजिक उपक्रमांचा समावेश आहे. समाजातील गरजू घटकांना मदतीचा हात देत सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम ट्रस्टच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

महाप्रसादासाठी अनेक देणगीदार व दानशूर व्यक्तींनी अन्नधान्य, शिधा तसेच आर्थिक स्वरूपात सहकार्य केले. त्यांच्या सहकार्यामुळेच हा महाप्रसाद मोठ्या प्रमाणात आणि उत्साहात यशस्वी झाला. धार्मिकतेसोबतच सेवाभावाची परंपरा जपणाऱ्या पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टच्या या उपक्रमाचे भाविकांनी कौतुक केले.

# शिवछत्रपतींची न्यूयॉर्कमध्ये मिरवणूक

## छत्रपती फाउंडेशनच्या कीर्तीरथाने महाराष्ट्राचा इतिहास पोहोचला सातासमुद्रापार

नगर – भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने न्यूयॉर्क येथे १६ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आलेल्या इंडिया डे परेडमध्ये छत्रपती फाउंडेशन, न्यूयॉर्कच्या वतीने सादर करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या कीर्तीरथाने हजारो भारतीय तसेच अमेरिकन नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. जगाची आर्थिक राजधानी असलेल्या न्यूयॉर्कमधील प्रशस्त मॅडिसन अव्हेन्यूवर भगवे वातावरण निर्माण झाले होते. कीर्तीरथासोबत जल्लोष ढोल–ताशा पथकाच्या ५० हून अधिक वादकांनी केलेल्या वादनाने न्यूयॉर्क शहर दुमदुमून गेले. जगप्रसिद्ध रुद्रा डान्स ग्रुपच्या कलाकारांनी विविध लोकनृत्ये सादर केली, तर लिव्हिंगस्टनचा राजा ग्रुपच्या युवतींनी नववारी साड्यांमध्ये लेझीम सादर करून रस्त्याच्या दुतर्फा जमलेल्या नागरिकांची मने जिंकली.





न्यूयॉर्क येथे आयोजित इंडिया डे परेडमध्ये सहभागी झालेला छत्रपती शिवाजी महाराज कीर्तीरथ.

महाराष्ट्र शासनाचा पर्यटन विभाग तसेच मराठी भाषा मंत्रालयाच्या आंतरराष्ट्रीय मराठी मंचाचे या उपक्रमाला सहकार्य लाभले. कीर्तीरथावर छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ, बाल शिवबा आणि मावळ्यांच्या भूमिका साकारण्यात आल्या. बालक, महिला आणि युवकांनी आकर्षक पोशाख व प्रभावी अभिनयातून शिवकालीन ऐतिहासिक प्रसंग जिवंत केले. १०० हून अधिक सहभागींच्या माध्यमातून महाराष्ट्राचा इतिहास, संस्कृती आणि लोककलेचे भव्य दर्शन अमेरिकेत घडविण्यात आले. अमेरिकेतील विविध प्रांतांत वास्तव्यास असलेले भारतीय या परेडमध्ये मोठ्या उत्साहाने सहभागी झाले. यावर्षी विशेषतः भारतीयांसोबतच स्थानिक अमेरिकन तसेच विविध देशांतून आलेल्या नागरिकांचाही मोठा सहभाग होता. ढोल–ताशा, संगीत, पारंपरिक पोशाख, नृत्य आणि ऐतिहासिक देखाव्याचे उपस्थितांनी कौतुक करत भारताच्या स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या.

परेडचे ग्रँड मार्शल म्हणून न्यूयॉर्क राज्याच्या गव्हर्नर कॅथी होचल यांचा सन्मान करण्यात आला. न्यूयॉर्कच्या विकासात भारतीय समुदायाचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. मिशिगन राज्याचे यूएस हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हचे खासदार ठाणेदार यांनी पूर्णवेळ कीर्तीरथावर विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहून रथावरून नागरिकांना अभिवादन केले. परेड स्टेजवरूनही त्यांनी परेडचे निरीक्षण केले. शिवाजी महाराज हे सर्वोत्तम स्ट्रॅटेजिस्ट होते. त्यांचे गुण, न्याय्य वृत्ती आणि उद्योजकतेची भावना आजही प्रेरणादायी असून, युवकांनी शिवरायांच्या चरित्रातून अनेक धडे घ्यावेत, असे सांगत छत्रपती फाउंडेशनच्या कार्याचे त्यांनी कौतुक केले. न्यू हॅम्पशायरचे स्टेट रिप्रेझेन्टेटिव्ह संतोष साळवी हेही विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. भारताचे न्यूयॉर्क येथील उप–राजदूत विशाल हर्ष आणि वाणिज्य दूत राजलक्ष्मी कदम यांनी छत्रपती फाउंडेशनसोबतचे सहकार्य भविष्यात अधिक वृद्धिंगत करण्यासाठी प्रयत्न करण्याची अपेक्षा व्यक्त केली. बॉलीवूड अभिनेत्री पूजा हेगडे तसेच तारक मेहता का उलटा चश्मा मालिकेची संपूर्ण टीमही परेडमध्ये उपस्थित होती.



महाराष्ट्र बालक मंदिर शाळेत गुणवंत विद्यार्थ्यांचा व मार्गदर्शक शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. (छाया : उदय जोशी)

# महाराष्ट्र बालक मंदिरचे शिष्यवृत्तीत घवघवीत यश; गुणवंत विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचा सन्मान

नगर – महाराष्ट्र राज्य परीक्षा परीषद पुणे आयोजित इयत्ता ४ थी शिष्यवृत्ती परीक्षेत लालटाकी रोडवरील महाराष्ट्र बालक मंदिर शाळेने उल्लेखनीय यश संपादन केले. या यशाबद्दल अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सहसचिव मुकेश मुळे व कार्यकारिणी सदस्य अर्जुनराव पोकळे यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थी तसेच मार्गदर्शक शिक्षकांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी माजी मुख्याध्यापक सुरेश शेवाळे, माजी मुख्याध्यापिका अर्चना गिरी, मुख्याध्यापिका सुनिता शेवाळे, भारती तांबे, आशा कराळे, वैशाली मंगलारम आदी उपस्थित होते. शाळेतील शौर्य टकले (२४६), स्वरांजली उगले (२४०), कानिफ घोडके (२३२), स्वानंद दहिफळे (२३०), युवराज ठुबे (२२८), रुद्र ढवळे (२२८), श्लोक कोतकर (२२४), अनन्या कुटे (२२४), सोहम सिनारे (२२२) आणि विराज कोळपे (२२२) या विद्यार्थ्यांनी जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळविले. या विद्यार्थ्यांना भारती तांबे, आशा कराळे व वैशाली मंगलारम यांनी मार्गदर्शन केले.

विद्यार्थी अनन्या कुटे, कानिफ घोडके तसेच पालक संतोष उगले व अंकुश टकले यांनी मनोगत व्यक्त करून शाळेचे व शिक्षकांचे आभार मानले. मुख्याध्यापिका सुनिता शेवाळे यांनी प्रास्ताविकात शाळेत राबविणाऱ्या विविध उपक्रमांविषयी माहिती सांगितली. सूत्रसंचालन जयश्री म्याना यांनी केले. आभार आशा कराळे यांनी मानले.

# महिलांची कुचंबणा टाळण्यासाठी फिरती स्वच्छतागृहे उभारा



नगर – गणेशोत्सवाच्या काळात अहिल्यानगर शहरात विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने महिलांसाठी पुरेशी सार्वजनिक स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी माजी नगरसेवक संजय झिंजे यांनी महापौरांकडे निवेदनाद्वारे केली आहे. शहरातील प्रमुख गणेश मंडळांजवळ तसेच विसर्जनस्थळी महानगरपालिकेच्या वतीने फिरत्या स्वच्छतागृहांची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

शहरातील विविध गणेश मंडळांनी उत्सवाची तयारी सुरू केली आहे. गणेशोत्सवाच्या काळात शहरातील आकर्षक देखावे पाहण्यासाठी तसेच गणेश विसर्जनाच्या मिरवणुका पाहण्यासाठी अहिल्यानगर शहरासह ग्रामीण भागातून मोठ्या संख्येने नागरिक शहरात दाखल होतात. यामध्ये महिला व मुलींची संख्याही मोठी असते. मात्र, शहरातील अनेक भागांत महिलांसाठी पुरेशा सार्वजनिक स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध नसल्याने महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. गणेशोत्सवासारख्या मोठ्या उत्सवाच्या काळात ही समस्या आणखी गंभीर होण्याची शक्यता असल्याने महापालिका प्रशासनाने आतापासूनच आवश्यक नियोजन करावे, अशी मागणी झिंजे यांनी केली आहे.

गणेशोत्सवातील देखावे पाहण्यासाठी शहरात येणाऱ्या महिला तसेच विसर्जन मिरवणूक पाहण्यासाठी येणाऱ्या कुटुंबांना मूलभूत सुविधा मिळणे आवश्यक आहे. स्वच्छतागृहासारखी अत्यावश्यक सुविधा उपलब्ध नसल्याने महिलांची कुचंबणा होणे ही गंभीर बाब आहे, असे झिंजे यांनी निवेदनात नमूद केले आहे. यावर्षीच्या गणेशोत्सवाच्या काळात शहरातील प्रमुख गणेश मंडळांच्या परिसरात महानगरपालिकेने फिरती स्वच्छतागृहे उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. केवळ स्वच्छतागृह उभारून न थांबता त्याठिकाणी पुरेशा प्रमाणात पाण्याची व्यवस्था करावी. तसेच स्वच्छतागृहांची नियमित स्वच्छता आणि देखभाल करण्यासाठी महानगरपालिकेचे कर्मचारी नियुक्त करावेत, अशीही मागणी झिंजे यांनी केली आहे.

# शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांचा सत्कार

नगर – नवी दिल्ली येथील राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन आणि प्रशासन संस्थेच्यावतीने देण्यात येणाऱ्या राष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल अहिल्यानगर माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांचा महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, अहिल्यानगर तसेच अहिल्यानगर मुख्याध्यापक संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला.



नवी दिल्ली येथील राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन आणि प्रशासन संस्थेच्यावतीने देण्यात येणाऱ्या राष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल अहिल्यानगर माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांचा महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, अहिल्यानगर तसेच अहिल्यानगर मुख्याध्यापक संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य, शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी केलेले प्रयत्न तसेच प्रशासनाच्या माध्यमातून शिक्षण व्यवस्थेला दिलेल्या योगदानाची दखल घेत गायकवाड यांची राष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड झाली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शिक्षक, मुख्याध्यापक व शिक्षण क्षेत्रातील विविध मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले. यावेळी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी तसेच अहिल्यानगर मुख्याध्यापक संघाच्या प्रतिनिधींनी शिक्षणाधिकारी गायकवाड यांचा पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला. याप्रसंगी अहिल्यानगर जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्राचार्य सुनील पंडित, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे शहर जिल्हाध्यक्ष प्रसाद सामलेटी, शहर मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष ज्ञानदेव बेरड, दादा चौधरी शाळेचे मुख्याध्यापक अशोक डोळसे, राष्ट्रीय पाठशाळेचे मुख्याध्यापक बोडखे, प्राचार्य शुभम टेमकर, साजिद पठाण, तौसिफ पठाण, नाना देवतरसे, शिदोरे, महिला आघाडीच्या कोकाटे, प्राथमिक संघटनेचे श्रीराम खाडे, तुकाराम तनपुरे आदी उपस्थित होते.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# धम्माल मनोरंजन

सुविचार



''पुस्तकाची किमत रत्नापेक्षाही अधिक आहे.''

## दिनविशेष ०४ सप्टेंबर

१२२१: महानुभाव पंथाचे संस्थापक श्री चक्रधर स्वामी यांचा जन्म. (मृत्यू: ७ फेब्रुवारी १२७४) १८२५: भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे एक संस्थापक, ब्रिटिश संसदेचे सदस्यत्त्व मिळवणारे पहिले भारतीय पितामह दादाभाई नौरोजी यांचा जन्म. (मृत्यू: ३० जून १९१७) १९०१: जॅग्वोर कार चे सहसंस्थापक विल्यम लियन्स जॅग्वोर यांचा जन्म. (मृत्यू: ८ फेब्रुवारी १९८५) १९०५: मिनॉक्स चे शोधक वॉल्टर झाप यांचा जन्म. (मृत्यू: १७ जुलै २००३)१९१३: प्रशासक व मुत्सद्दी, पंतप्रधानांचे मुख्य सचिव पी. एन. हक्सर यांचा जन्म. (मृत्यू: २५ नोव्हेंबर १९९८)१९२३: भारतीय वकील आणि राजकारणी राम किशोर शुक्ला यांचा जन्म. (मृत्यू: ११ डिसेंबर २००३)१९३७: साहित्यिक व समीक्षक शंकर सारडा यांचा जन्म.१९४१: केंद्रीय गृहमंत्री व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांचा जन्म. १९५२: अभिनेता ऋषी कपूर यांचा जन्म. १९६२: यष्टीरक्षक किरण मोरे यांचा जन्म. १९६४: भारतीय गायक–गीतकार आदेश श्रीवास्तव यांचा जन्म. (मृत्यू: ५ सप्टेंबर २०१५)१९७१: दक्षिण अफ्रिकेचा अष्टपैलू क्रिकेटपटू लान्स क्लूसनर यांचा जन्म. १९३१: भारतीय–अमेरिकन धर्मगुरू आणि मानसोपचारतज्ज्ञ अँथनी डी मेलो यांचा जन्म (मृत्यू : २ जून १९८७)१९२७: लिस्प प्रोग्रॅमिंग लँग्वेजचे जनक जॉन मॅक्कार्थी यांचा जन्म (मृत्यू : २४ ऑक्टोबर २०११)१९१३: अमेरिकन बायोकेमिस्ट आणि शैक्षणिक – नोबेल पुरस्कार स्टॅनफोर्ड मूर यांचा जन्म (मृत्यू : २३ ऑगस्ट १९८२) १८८७: शत्रूच्या विमानाला जमिनीवरून हवेत गोळ्या घालणारे पहिले व्यक्ती रॅडोजे लजुटोव्हॅक यांचा जन्म (मृत्यू : २५ नोव्हेंबर१९६८)

१५६३: चीन देशाचे सम्राट वानली सम्राट यांचा जन्म (मृत्यू : १८ ऑगस्ट १६२०)

मृत्यू१९९७: हिन्दी लेखक, कवी, नाटककार, पत्रकार व धर्मयुग साप्ताहिकाचे २७ वर्षे संपादक डॉ. धर्मवीर भारती याचं निधन. (जन्म: २५ डिसेंबर १९२६)२०००: खळाळून हसवणारे विनोदी कलाकार मोहम्मद उमर मुक्री याचं निधन. (जन्म: ५ जानेवारी १९२२)२०१२: भारतीय लेखक सय्यद मुस्तफा सिराज यांचे निधन. (जन्म: १३ ऑक्टोबर १९३०)२०१२: भारतीय गायक–गीतकार हांक सूफी यांचे निधन. (जन्म: ३ मार्च १९५२)२०१५: भारतीय सर्जन आणि राजकारणी विल्फ्रेड डी डिसोझा यांचे निधन. (जन्म: २३ एप्रिल १९२७)

२०२२: भारतीय व्यापारी, उद्योगपती सायरस पालोनजी मिस्त्री यांचे निधन (जन्म: ४ जुलै १९६८) २०२२: भारतीय रंगमंच अभिनेते रामचंद्रन मोकेरी यांचे निधन२०२२: भारतीय राजकारणी, उत्तर प्रदेशचे आमदार राम नरेश रावत यांचे निधन (जन्म: ७ मे १९६७)

## महाशब्दकोडे

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | | ३ | ■ | ■ | ४ | | ५ | | ६ |
| | ■ | | ■ | ■ | ७ | | ■ | ■ | ■ | | ■ | |
| ८ | ९ | | | | ■ | ■ | १० | ११ | | | | ■ |
| १२ | | | ■ | ■ | ■ | ■ | १३ | | ■ | | ■ | १४ |
| | ■ | ■ | १५ | १६ | | | | ■ | १७ | ■ | १८ | |
| ■ | १९ | | | | ■ | ■ | २० | २१ | | २२ | | |
| २३ | | ■ | २४ | | २५ | २६ | ■ | २७ | | | ■ | ■ |
| २८ | | २९ | | ■ | ३० | | | ■ | ३१ | | | ३२ |
| | ■ | ३३ | | ३४ | | | ■ | ३५ | ■ | ■ | ■ | |
| | ■ | | ■ | ३६ | | ■ | ३७ | | ३८ | ■ | ३९ | ■ |
| ४० | ४१ | ■ | ४२ | | ■ | ४३ | | | | | | ४४ |
| ■ | | ■ | ४५ | | ४६ | ■ | ■ | | ■ | ■ | ४७ | |
| ४८ | | | | ■ | ४९ | | | ■ | ५० | | | ■ |

### आडवे संकेत

१) मनाविरुद्धचे लग्न
४) शिव्यांचा वर्षाव, पाणऊतारा
७) संधान, धागा दोरा
८) सदा भटकणारा, फिरस्ता, गोसावी
१०) ज्याला कोणी शत्रू नाही असा
१२) पेशंट (हिं.)
१३) चोप, ताडण
१५) राखीपुनव
१८) मनातील अभिप्राय
१९) सोहनीचा जोडी
२०) वर्चस्व
२३) धमणी
२४) चांगले डोळे
२७) डुक्कर
२८) गळालेले अक्षर वर लिहिताना करतात ती ( ∧ ) खूण
३०) मोठी कढई
३१) अगस्ती ऋषीचा पिता
३३) संगीत बनविणारा
३६) तेलधान्याची सुगी, हंगाम, मोसम
४०) पायाची मागील बाजू
४२) सारखा
४३) विनाकारणची कामे
४५) एक रंग
४७) खाट, चारपाई
४८) धातुचा रुपया
४९) दैत्य, दानव
५०) तिरुपती xxx

### उभे संकेत

१) श्रीकृष्ण
२) श्रेष्ठ, पहिला, प्रमुख, मुकुटमणी
३) स्माईल
५) एक ऋषी, एक आडनाव
६) करंडा
९) रोगाची साथ, मरणदशा
१०) ठेव (हिं.)
११) दुराचारी
१४) ऐ मेरे के लोगो....
१५) सरकारशी झालेला करार
१६) धुणे १७) मृत्यूदेव
१८) सहद १९) बारीक चिलट
२१) नविन
२२) लहान कालवा
२३) नेहमी नाही म्हणून कामे न घेणारा
२५) योग्यवेळी
२६) नऊ प्रकारचे रत्न
२९) आवडणे ३२) चेहरा
३४) अस्थिर मन
३५) गंगेचा काठ
३७) एक पक्षी
३८) मृदू, नरम
३९) साठवून ठेवणे
४१) कवाली म्हणणारा
४२) गर्भार
४४) निगा, सांभाळ
४६) हवा

### मागील उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चि | ख | ल | द | रा | ■ | ■ | ■ | आ | का | श | या | न |
| त्र | ■ | व | ही | ■ | बा | ■ | ऐ | प | त | ■ | त | ■ |
| गु | ण | क | ■ | ब | र | सा | त | ■ | का | ■ | जा | ऊ |
| प्त | ■ | र | ■ | र | ■ | स | खा | रा | म | ■ | त | र |
| ■ | सं | ■ | र | ड | त | रा | ऊ | त | ■ | कु | ■ | ■ |
| मा | घ | ■ | बि | ■ | क | ■ | ■ | ■ | ■ | बु | ■ | का |
| न | ट | ■ | ला | ज | रा | ■ | सा | ठी | बु | द्धि | ना | ठी |
| म | ना | ■ | व | डा | र | ■ | य | ■ | ट | ■ | ग | ■ |
| र्या | ■ | पा | ल | व | ■ | प | ■ | क | बु | त | र | ■ |
| दा | व | ण | ■ | ■ | पा | थ | र | व | ट | ■ | चु | का |
| ■ | न | द | ■ | गा | य | क | वा | ड | ■ | बं | डा | ळी |
| से | वा | ■ | सं | य | म | ■ | ■ | सा | ■ | जा | ■ | मा |
| ■ | स | मा | धी | ■ | ळी | ■ | ■ | ■ | बा | रा | म | ती |




१) आंब्यांच्या बहुतेक जातींना एक वर्षाआड फळे येतात खालीलपैकी कोणती जात मात्र दरवर्षी फळे देते?
अ) हापूस ब) केशरी क)निलम ड)दशेरी

२) पावनेतीन किलोग्रॅम साखरेच्या २५० ग्रॅमची एक या प्रमाणे किती पिशव्या तयार होतील?
अ)११ ब)१२ क)१३ ड)१४

३) दोन अंकी दोन संख्यांचा मसावी १५ असून लसावी हा मसावीच्या १५ पट आहे तर त्यापैकी लहान संख्या कोणती?
अ)३० ब)१५ क)४५ ड) ७५

४) एखादी व्यक्ती कोणत्या कारणावरुन संसद सदस्य म्हणून अपात्र ठरु शकते?
अ)अविमुक्त नादर असल्यास ब)मनोविकल असल्यास क)शासकीय लाभपदावर असल्यास ड) वरिल सर्व

५)कोणत्या राज्यास सोयाबीन राज्य असे म्हणतात?
अ)पश्चिम बंगाल ब)महाराष्ट्र
क)ओरिसा ड) पंजाब

६) ममीफिकेशन ही विकृती विशेषतः कोणत्या फळावर आढळून येते?
अ)डाळींब ब)संत्रा क)द्राक्ष ड)शेफ

७) राज्यातील पहिले कृषी चिकित्सालय कोठे बांधण्यात आले?
अ)नागपूर ब)काष्टी क)बुलडाणा ड)जालना

८) दुध के पूर्ण अन्न आहे कारण ..... ?
अ)त्यात जास्त स्निग्ध पदार्थ आहेत
ब) त्यात प्रथिने जास्त आहे
क)त्यात शर्करा, खनिजे, मुलतत्त्वे आहेत
ड) वरिल पूर्ण घटके आहेत

९) अंतत्रावी ग्रंथी विशिष्ट...... चा स्त्राव निर्माण करतात?
अ)जिवनसत्त्व ब)संप्रेरकक)प्रथिने ड) विकर


१०) भारतीय राज्य घटनेची अंमलबजावणी केव्हापासून झाली?
अ)२६ जानेवारी १९५० ब) १५ ऑगस्ट १९४८
क)६ नोव्हेंबर १९४७ ड) १ जानेवारी १९४८

११) रमेश घराकडे तोंड करुन उभा होता. त्याच्या उजव्या बाजूला उत्तर दिशा होती तो तीन वेळा काटकोनात डावीकडे वळला. आता घर त्याच्या कोणत्या बाजूला आहे?
अ) समोरच्या ब)मागील क)उजव्या ड) डाव्या

उत्तरः (१-क), (२-अ), (३-क), (४- ड), (५-ब), (६-क), (७-ब), (८-ड), (९-ब ), (१०-अ ), (११-ड)

- भारताचे पहिले राष्ट्रपती- डॉ. राजेंद्रप्रसाद
- भारताचे पहिले उपराष्ट्रपती- डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन
- भारताचे पहिले मुस्लिम राष्ट्रपती- डॉ. झाकीर हुसेन
- भारताचे पहिले शीख राष्ट्रपती- ग्यानी झैलसिंग
- पदावर असताना निधन पावलेले पहिले राष्ट्रपती – डॉ. झाकीर हुसेन
- भारताचे पहिले पंतप्रधान- पंडित जवाहरलाल नेहरु
- लोकसभेचे पहिले सभापती- सरदार वल्लभभाई पटेल
- लोकसभेचे पहिले सभापती- ग.वा. मावळंकर
- सर्वोच्च न्यायालयाचे पहिले सरन्यायाधीश- न्या. हिरालाल कनिया
- उच्च न्यायालयाचे पहिले भारतीय न्यायाधीश – शंभूनाथ पंडित
- स्वतंत्र भारताचे पहिले भारतीय सरसेनानी – जनरल करिअप्पा
- स्वतंत्र भारताचे पहिले भूदल प्रमुख- जनरल एम. राजेंद्रसिंग
- भारताचे पहिले फिल्ड मार्शल- एस.एच. एफ.जे. माणेकशा
- स्वतंत्र भारताचे पहिले हवाईदल प्रमुख – एअर मार्शल एस. मुखर्जी
- स्वतंत्र भारताचे पहिले नौदल प्रमुख- व्हाइस ॲडमिरल आर.डी. कटारी
- भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे पहिले अध्यक्ष- व्योमेशचंद्र बॅनर्जी
- पहिले भारतीय आय.सी.एस. अधिकारी- सत्येंद्रनाथ टागोर
- आय.सी.एस परीक्षा उत्तीर्ण होणारे पहिले भारतीय- सुरेंद्रनाथ बॅनर्जी
- बॅरिस्टरची पदवी मिळविणारे पहिले भारतीय- ज्ञानेंद्रमोहन टागोर
- पहिले भारतीय वैमानिक- जे.आर. डी. टाटा (१९२९)

## फिल्मी शब्दकोडे



| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | | | ■ | ३ | | | ४ | | |
| | ■ | | ■ | ■ | ■ | ■ | | ■ | ■ | | ■ | ■ |
| ■ | ५ | | | ६ | | | | ■ | ■ | ७ | | |
| ८ | ■ | | ■ | | ■ | ■ | ■ | ९ | | | ■ | ■ |
| | ■ | ■ | ■ | | ■ | १० | | ■ | ■ | | ■ | ११ |
| ■ | १२ | | | | | | ■ | १३ | ■ | १४ | | |
| १५ | ■ | ■ | ■ | | ■ | १६ | | | १७ | ■ | ■ | |
| १८ | | | १९ | | ■ | | ■ | ■ | २० | | ■ | |
| | ■ | ■ | | ■ | २१ | | | २२ | ■ | ■ | ■ | |
| | ■ | २३ | | ■ | ■ | | ■ | २४ | | २५ | | ■ |
| ■ | ■ | ■ | २६ | | ■ | २७ | | | ■ | | ■ | २८ |
| २९ | ३० | | | ■ | ■ | | ■ | | ■ | ३१ | | |
| ■ | | ■ | ■ | ३२ | | ■ | ३३ | | | ■ | ■ | |

### आडवे संकेत

१) करीश्मा कपूर की नायीका बहन.
३) सन् २००० में बनी फिल्म कहो ना प्यार है की नायीका.
५) सन् २००३ में बनी फिल्म दिल का रिश्ता का नायक.
७) अमिताभ बच्चन और जयाप्रदा अभिनीत फिल्म.
९) तु चिज बडी है मस्त मस्त.... यह गाना इस फिल्म का है.
१०) तेरा XX चल गया (फिल्म)
१२) सन् २००३ में बनी फिल्म कोई मिल गया का नायक.
१४) ग्रेसी सिंह अभिनीत पहली फिल्म.
१६) गोविंदा और मनिषा कोईराला अभिनीत फिल्म.
१८) अनिल कपूर, माधूरी दीक्षीत, जैकी श्रॉफ और डिम्पल कपाडीया अभिनीत फिल्म.
२०) XX पडोसन (फिल्म)
२१) सन् २००२ में निर्देशक अब्बास मस्तान की इस फिल्म में बॉबी देओल, अमिषा पटेल और अक्षय खन्ना थे.
२३) XX पाठक (सहनायीका)
२४) सन् २००१ में बनी फिल्म रहना है तेरे दिल में का नायक.
२६) XX बॉस (फिल्म)
२७) हलाल की (फिल्म)
२९) सन् १९९८ में नरेश मल्होत्रा के निर्देशन में बनी इस फिल्म में गोविंदा और मनिषा कोईराला थे.
३१) सुश्मिता सेन अभिनीत पहली फिल्म.
३२) प्रेम ग्रंथ इस फिल्म का नायक. (सिर्फ नाम)
३३) XXX आयेगी बारात (फिल्म)

### उभे संकेत

१) कभी खुशी XX गम (फिल्म)
२) सन् १९९२ में बनी फिल्म द्रोही का नायक.
३) XXX पालेकर (अभिनेता)
४) सन् १९९३ में बनी फिल्म सर में पुजा भट्ट के पिता कौन थे.
६) हृत्विक रोशन के अभिनेता पिता.
८) सन् २००० में बनी फिल्म बादल की नायीका. (सिर्फ नाम)
१०) सन् १९९९ में निर्देशक अंदलीब सुल्तानपुरी की इस फिल्म में सलमान खान और उर्मिला थे.
११) गोविंदा और दिव्या भारती अभिनीत फिल्म.
१३) XX सिंह (नायक)
१५) अक्षय कुमार, सुनील शेट्टी और परेश रावल अभिनीत फिल्म.
१७) XX हथेली पे (फिल्म)
१९) संजय दत्त, माधूरी दीक्षीत और जैकी श्रॉफ अभिनीत फिल्म.
२२) इस फिल्म में अनिल कपूर, माधूरी दीक्षीत और हेमा मालिनी थे.
२५) सन् १९९८ में निर्माता निर्देशक एन. चंद्रा की इस फिल्म में मुकुल देव और माधूरी दीक्षीत थे. २८) सन् १९९० में बनी फिल्म अव्वल नंबर की नायीका.
३०) राजू XX (फिल्म)

### मागील फिल्मी उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| य | ल | गा | र | ■ | माँ | ■ | ■ | ■ | ■ | ■ | ■ | आ |
| श | ■ | ■ | ■ | ■ | ■ | अ | ■ | स | ■ | आ | गा | ज |
| चो | री | चो | री | चु | प | के | चु | प | के | ■ | ■ | की |
| प | ■ | र | ■ | ■ | ■ | ला | ■ | ने | ■ | का | ■ | औ |
| डा | ■ | म | स्त | ■ | रो | ■ | ■ | ■ | ■ | रो | ■ | र |
| ■ | चा | चा | ■ | रा | जा | की | आ | ये | गी | बा | रा | त |
| ■ | ■ | ये | ■ | ज | ■ | ■ | ■ | म | ■ | र | ■ | ■ |
| ■ | कि | शो | र | कु | मा | र | ■ | झ | ■ | ■ | ■ | ■ |
| ज | मी | र | ■ | मा | ■ | ■ | रा | धा | का | सं | ग | म |
| ■ | का | ■ | ■ | र | क्ष | क | ■ | र | ■ | दी | ■ | ■ |
| ■ | ट | क्क | र | ■ | ■ | या | ■ | ■ | ■ | प | रीं | दा |
| ■ | क | ■ | ■ | आ | ल | म | ■ | मु | ■ | चौ | ■ | मि |
| ■ | र | घु | वि | र | ■ | त | म | न्ना | ■ | था | ■ | नी |

विनोद



एका नटीने जेव्हा चौथ्यांदा लग्न केले तेव्हा मेजवानी देताना आपल्या मित्रांच्या घोळक्यात असताना म्हणाली, ''मी माझ्या नव्या नवऱ्याला सर्व काही सांगुन टाकलं आहे. मागील सर्व चुका त्याला मोजायला लावल्या आहेत. सर्व मित्र आणि प्रेमिकांची नावे सांगून टाकली आहेत.।'' एकजण म्हणाला, ''वा ह, काय धाडस आहे। काय ईमानदारी आहे।दुसरा म्हणाला, 'आणि काय आठवणी आहेत। जबाब नही।''

----------------------

रमेश–अरे, तु दिवसभर गप्पाच मारित बसणार काय? सुभाष– तुला काय वाटतं,मी पशुक्ष्यांना मारावं? अरे या जमान्यात गप्पा मारणं हेच अहिंसात्मक कार्य आहे. समजलं?

चारोळी

जीवनाचें गाणे आपण
दोघांनी मिळून गायचें असते
मी तुझी बासरी सख्या
तू मुरारी व्हायचे असते.

# जुन्या पेन्शनसाठी शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे काळ्या फितीने आंदोलन सुरु

### ५ सप्टेंबरला जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे, २८ सप्टेंबरपासून मुंबईत सहकुटुंब आंदोलन

नगर – जुन्या पेन्शन योजनेपासून वंचित ठेवण्यात आल्याच्या निषेधार्थ राज्यातील माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचे रणशिंग फुंकले आहे. १ सप्टेंबर पासून काळ्या फिती बांधून शासनाच्या धोरणाचा निषेध नोंदविण्यास सुरुवात केली आहे. १ ते ४ सप्टेंबर या कालावधीत काळ्या फिती बांधून नियमित शैक्षणिक कामकाज सुरू ठेवत हे आंदोलन करण्यात येत आहे.

यानंतर शिक्षक दिनाचे औचित्य साधून ५ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. जुन्या पेन्शन योजनेच्या मागणीबाबत शासनाने अद्याप ठोस निर्णय घेतला नसल्याने आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शासनाने मागणीची दखल घेऊन सकारात्मक निर्णय न घेतल्यास २८ सप्टेंबरपासून मुंबईतील आझाद मैदानावर सहकुटुंब आंदोलन छेडण्यात येईल, तसेच आमरण उपोषण करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. जुनी पेन्शन कोअर कमिटीचे राज्य सचिव तथा जुन्या पेन्शन योजना समन्वय संघाचे राज्य समन्वयक महेंद्र हिंगे आणि राज्य समन्वयक सुनील भोर यांनी ही माहिती दिली.

आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात १ ते ४ सप्टेंबरदरम्यान शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी काळ्या फिती बांधून शाळांमध्ये नियमित शैक्षणिक कामकाज पार पाडणार आहेत. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, याची काळजी घेत शासनाच्या धोरणाचा निषेध करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. काळ्या फिती हे शासनाच्या धोरणाविरोधातील निषेधाचे प्रतीक म्हणून वापरण्यात येणार असून, या माध्यमातून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागणीकडे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

आंदोलनाच्या पुढील टप्प्यात ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनाच्या दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. शिक्षकांचा सन्मान करण्याचा दिवस असतानाच आपल्या न्याय्य हक्कासाठी शिक्षकांना आंदोलन करावे लागत असल्याची खंत आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली आहे. या धरणे आंदोलनात जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

शासनाने या आंदोलनाची दखल घेऊन जुन्या पेन्शन योजनेबाबत ठोस निर्णय घेतला नाही, तर आंदोलन आणखी तीव्र करण्यात येणार आहे. २८ सप्टेंबरपासून मुंबईतील आझाद मैदानावर सहकुटुंब आंदोलन छेडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याचबरोबर मागणी मान्य होईपर्यंत आमरण उपोषण करण्याचा इशाराही संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील या आंदोलनासाठी महेंद्र हिंगे, सुनील भोर, देविदास खेडकर, दिलीप डोंगरे, संजय वाळे, संजय इघे, राज जाधव, सुनील दानवे, संजय भुसारी, राजू पठाण, जाकीर सय्यद, मुकुंद अंचवले, छबुराव फुंदे, बद्रीनाथ शिंदे, सुदाम दळवी, बाबासाहेब शिंदे, भाऊसाहेब शिंदे, अजित वडवकर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते प्रयत्नशील आहेत. या आंदोलनाला विविध शिक्षक संघटनांनीही पाठिंबा जाहीर केला आहे. मुख्याध्यापक संघाचे सुनील पंडित, माध्यमिक शिक्षक संघाचे आप्पासाहेब शिंदे, शिक्षक परिषदेचे बाबासाहेब बोडखे तसेच शिक्षक भारतीचे आप्पासाहेब जगताप यांनी आंदोलनाला पाठिंबा दिला आहे.

## ऋषिकेश फड यांचा सन्मान

नगर – पिंपळगाव रोठा येथील शाखा डाक कार्यालयाचे पोस्टमास्तर ऋषिकेश फड यांनी पुणे विभागामध्ये पिंपळगाव रोठा पोस्ट मास्तर चा तिसरा क्रमांक आणि अहिल्यानगर जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवला याबद्दल पिंपळगाव रोठा ग्रामस्थांच्या वतीने ग्रामस्थ, शेतकरी, विद्यार्थी, पालक, मुंबईकर मंडळी यांच्या वतीने ॲड. पांडुरंग गायकवाड यांनी फड यांचा सत्कार केला.

फड हे तीन वर्षांपूर्वी पिंपळगाव रोठा येथे सेवेला रुजू होऊन प्रथमच सेवा प्रारंभ केला होता. या काळात त्यांनी पिंपळगाव रोठा,कारेगाव व अक्कलवाडी या गावांमधून ७०० खाते दारांची बचत खाते आणि ४०० ऑनलाइन खाते सुरु केले. आज रोजीला या ग्रामीण भागातील पोस्ट कार्यालयात पासबुक धारक खातेदारांची संख्या दीड हजाराच्या पुढे असून एक नवा उच्चांक प्रस्थापित केला आहे.



## गुरुवाणी – ३९
## पर्युषण पर्वाची सुवर्णसंधी

श्वासोच्छ्वासाच्या एका क्रियेत जरी कौशल्य निर्माण झाले तर आतून संक्रमण होईल. अंतरंगात बदल होईल. कोणत्याही समस्येचे उत्तर मिळते हा विश्वास ज्याच्या मनात असतो, त्याला मोक्ष प्राप्ती होते. ज्याला समस्येचे समाधान अशक्य वाटते तो मोक्ष स्विकारतच नाही. त्यामुळे त्याला मोक्ष प्राप्ती होत नाही. 'काहीही झाले तरी सुधारणा शक्य नाही' हे वाक्य बोलणे आधी बंद करा. कारण असा विचार करणारे आपल्या मोक्ष मार्गात भिंत उभी करतात. ज्याच्या मनात विश्वास आहे की मी करू शकतो. तोच मोक्षप्राप्ती कडे वाटचाल करतो. देशात कुठेही हिंदू साम्राज्य नव्हते. हिंदू मुघलांची चाकरी करायचे. तेव्हा महाराष्ट्रात एका मुलाने 'हिंदवी स्वराज्य' स्थापन्याचा निर्धार करत वयाच्या अवघ्या १६ व्या वर्षी रायरेश्वराच्या साक्षीने स्वराज्याची शपथ घेतली. त्यांच्या मनात विश्वास होता मी हे करू शकतो. म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराज 'युगपुरुष' ठरले. आग्र्याच्या कैदेतून छत्रपती शिवाजी महाराज सुटतील असे कोणालाच वाटत नव्हते. पण छत्रपतींच्या मनात दृढ विश्वास होता. ते सुखरूप स्वराज्यात पोहोचले.

असाच आत्मविश्वास जागृत करण्यासाठी पर्युषण पर्व आहे. ज्या दिवशी तुमचा माईंड सेट बदलेल तेव्हा तुम्ही सगळा नकाशा बदलाल. अडचण तुमच्या स्कीलची नाही माईंड सेटची आहे. हे बदलणं गरजेचं आहे. तुमची प्रत्येक सणाची थीम, ड्रेसकोड स्पेशल असते. त्याच प्रमाणे पर्युषण पर्वासाठीही ड्रेस कोड हवा. व्हाईट ड्रेस कोड सर्वांनी लक्षात ठेवायचा आहे. सगळे मोक्ष यात्री, पर्युषण पर्वाचे भक्त यांनी व्हाईट ड्रेसकोडचे पालन करावे. यामागे कपड्याचा बदल करणे हे उद्दिष्ट नाही तर तुमच्या मनात विश्वास जागृत करणे हे उद्दिष्ट आहे. एकसंघ होऊन शक्तीशाली बना. तरच इतरांचा तुमच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलेल. ते तुमची दखल घेतील. तुम्ही भगवान महावीरांची संतान आहात. महावीर अशक्य ते शक्य करून दाखवतात. हा सोशल आश्रव आहे. आपल्या समाजाचा हा विषय आहे. पर्युषण पर्व आपल्याला मिळालेला मोठा वारसा आहे. गुरूदेवांच्या पुण्यभूमीत नगरमध्ये पर्युषण पर्व कसे भव्यदिव्य होते हे देशाला दिसले पाहिजे. पुन्हा एकदा विक्रमी संख्येने अड्डाई झाली पाहिजे. मला नगरकरांवर पूर्ण विश्वास आहे. संघीय आश्रव, संघीय निर्जरा, संघीय संवर, संघीय बंध पर्युषण पर्वात करायचा आहे. ही एक सुवर्णसंधी आहे.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# श्रीराम मंदिरात ५ सप्टेंबरला गणपती मूर्तीची प्राणप्रतिष्ठा

नगर – बुरुडगाव रोडवरील चौरे मळ्यातील श्रीरामनगर येथील श्रीराम मंदिरात गणपती बाप्पाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा सोहळा ५ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आला आहे. परिसरातील नागरिकांनी एकत्र येऊन धार्मिक श्रद्धा, सामाजिक एकोपा आणि बंधुभाव जपण्याच्या उद्देशाने या सोहळ्याचे आयोजन केले आहे.

गणपती मूर्तीची प्राणप्रतिष्ठा दुपारी १२ वाजता होणार असून, त्यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. महाप्रसादाची वेळ दुपारी ४ ते रात्री ८ वाजेपर्यंत आहे. या सोहळ्यानिमित्त परिसरातील नागरिक, महिला, युवक आणि गणेशभक्तांनी उपस्थित राहून श्री गणरायाचे दर्शन घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता समाजातील विविध घटकांना एकत्र आणणारा आणि सामाजिक सलोखा दृढ करणारा उत्सव आहे. या पार्श्वभूमीवर श्रीराम मंदिरातील प्राणप्रतिष्ठा सोहळ्यातून परिसरात भक्तीबरोबरच सामाजिक एकात्मतेचा संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. विशेष सहकार्य सुरेखाताई नंदकुमार चौरे यांचे लाभले आहे. या मंगलमय सोहळ्यास सर्वांनी उपस्थित राहून श्री गणरायाच्या कृपेचा लाभ घ्यावा, तसेच महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन ॲड. बाळासाहेब मेहेत्रे व श्रीराम भक्त सेवा मंडळ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# मराठा समाजातील चळवळीतील पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा सन्मान

नगर – मराठा समाजातील विविध सामाजिक चळवळींमध्ये कार्यरत असलेल्या पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच सकल मराठा समाजातील मान्यवरांचा सन्मान सोहळा स्वराज्य बहुद्देशीय विकास संस्थेच्या वतीने उत्साहपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमास राजमाता जिजाऊ माँसाहेबांचे वंशज श्रीमंत शिवाजीराजे जाधव, सिंदखेडराजा हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी मराठा समाजाच्या सामाजिक, राजकीय व उद्योजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या विविध मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.



मराठा समाजातील चळवळीतील पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा सन्मान सोहळ्यात लहान मुलांच्या व्यावसायिक स्टॉल्सची पाहणी करताना राजमाता जिजाऊ माँसाहेबांचे वंशज श्रीमंत शिवाजीराजे जाधव व मान्यवर.

कार्यक्रमाच्या निमित्ताने मराठा समाजातील सामाजिक चळवळीतील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. माजातील एकजूट, सामाजिक बांधिलकी आणि विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे लहान मुलांसाठी आयोजित करण्यात आलेले व्यावसायिक स्टॉल्स. बाल उद्योजकांच्या कल्पकतेला, कलागुणांना आणि व्यवसाय कौशल्याला प्रोत्साहन मिळावे, तसेच लहान वयातच मुलांमध्ये उद्योजकतेची भावना निर्माण व्हावी, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या छोट्या उद्योजकांच्या स्टॉल्सना कार्यक्रमास उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांनी आवर्जून भेट दिली. त्यांनी मुलांचे कौतुक करत त्यांच्या स्टॉलवरील विविध वस्तूंची खरेदीही केली. मान्यवरांनी दाखविलेल्या या प्रोत्साहनामुळे बाल उद्योजकांमध्ये मोठा उत्साह निर्माण झाला.

या प्रसंगी श्रीमंत शिवाजीराजे जाधव, भाजपा जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, माजी उपमहापौर गीतांजली काळे, नगरसेवक संपराव बारसकर, दत्ता कावरे, नवनाथ कातोरे, उद्योजक शिवजीत डोके, उद्योजक संजय चव्हाण, उद्योजक चंद्रकांत गाडे, महावितरण एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर योगेश चव्हाण, उद्योजक डॉ. अविनाश मोरे, स्वामी देशमुख, सुशील थोरात, गोरक्षनाथ बांदल, किरण पवार, बापूराजे भोसले, सतीश इंगळे, राजन चेमटे, उदय अनभुले, सौरभ द्वारकुंडे, विनय वाखुरे, यशवंत तोडमल, गजेंद्र दांगट, संभाजी दाहतोंडे, अनुराधा येवले, अन्नपूर्णा ढम, रोहिणी वाघमारे तसेच मराठा समाजातील विविध क्षेत्रांतील अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे निवेदन प्रतिभा काळे यांनी केले.



अहिल्या-सरस्वती महोत्सवात डॉ. सुधा कांकरिया यांना अहिल्या जीवन गौरव पुरस्कार प्रदान करताना ॲड. मोनिका आशिया. समवेत सुवर्णा जाधव, डॉ. अमोल जाधव, डॉ. प्राजक्ता जाधव आदी.

# सुधा कांकरिया यांना अहिल्या जीवन गौरव पुरस्कार

नगर – येथील सुप्रसिध्द नेत्रतज्ज्ञ आणि स्त्री जन्माचे स्वागत करा चळवळीच्या आद्यप्रवर्तक डॉ. सुधा कांकरिया यांना अहिल्या सरस्वती महोत्सवात अहिल्या जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. सदर पुरस्कार ॲड. मोनिका पंकज आशिया यांच्या हस्ते व माजी सभापती सुवर्णा जाधव, डॉ. अमोल जाधव, डॉ. प्राजक्ता जाधव यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला.

चार दशकां पेक्षा जास्त काळ डॉ. सुधा कांकरिया यांनी स्त्री जन्माचे स्वागत करा या चळवळीसह, बालनाटय-रंगभूमीची चळवळ, पर्यावरण संवर्धन, नेत्रदानाची चळवळ, राजयोगा जीवनपध्दतीचा अभ्यास या सहित अनेक सकारात्मक सामाजिक परिवर्तनासाठी महत्वाचे योगदान दिले आहे. आपले जीवन समाजकल्याण, देशसेवा, मानवतावादी कार्यासाठी समर्पित केले आहे. विज्ञान आणि आध्यात्म आणि समाजसेवा यांचा अनोखा संगम त्यांच्या जीवनकार्यातुन प्रतिबिंबित होतो. म्हणून त्यांना अहिल्या जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

सरस्वती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या पुढाकाराने झालेल्या या अहिल्या सरस्वती महोत्सवात महिलांना मुक्त व्यासपीठ देऊन त्यांना निव्वळ आनंदाची संस्मरणीय भेट देण्यात आली. सुरूवातीला सादर झालेल्या नाटिकेत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची एंट्री सर्वांना इतिहासात नेणारी ठरली. कार्यक्रमाचे आभार डॉ. अमोल जाधव यांनी मानले. सूत्रसंचालन महेश सोनी व उध्दव काळापहाड यांनी केले.

# नगरमध्ये ५ व ६ सप्टेंबरला १४ वर्षाखालील जिल्हास्तरीय क्रिकेट निवड चाचणी स्पर्धा

नगर – महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या माध्यमातून आणि अहमदनगर जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने १४ वर्षाखालील खेळाडूंसाठी जिल्हा क्रिकेट निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. ही निवड चाचणी ५ आणि ६ सप्टेंबर रोजी नगरमधील वाडिया पार्क मैदान, बॅडमिंटन हॉल शेजारील जिल्हा क्रिकेट असोसिएशन अकादमीच्या मैदानावर पार पडणार आहे.

खेळाडूंची गैरसोय होऊ नये म्हणून ग्रामीण आणि शहरी भागासाठी स्वतंत्र दिवस ठरवून देण्यात आले आहेत. वेळापत्रकानुसार, ५ सप्टेंबर रोजी ग्रामीण भागातील खेळाडूंची निवड चाचणी होईल, तर ६ सप्टेंबर २०२६ रोजी शहरातील खेळाडूंसाठी निवड चाचणी पार पडेल. दोन्ही दिवशी सकाळी ७:३० ते ९:३० वाजेपर्यंत ही प्रक्रिया चालणार आहे.

निवड चाचणीसाठी येणाऱ्या खेळाडूचा जन्म १ सप्टेंबर २०१२ नंतरचा असणे अनिवार्य आहे, ज्या खेळाडूंचे वय १२ वर्षे पूर्ण झाले आहे, अशाच खेळाडूंना प्रवेश दिला जाईल, ज्यांचे वय ९, १० आणि ११ वर्षे आहे, अशा खेळाडूंना निवड चाचणीसाठी नाव नोंदवता येणार नाही, असे संघटनेच्यावतीने कळविण्यात आले आहे.

जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र खेळाडूंनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा आणि निश्चित केलेल्या वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष आमदार संग्राम जगताप यांनी केले आहे.

# जैन ओसवाल समाज गौरव पुरस्काराबद्दल संतोष गांधी यांचा सत्कार

नगर – गांधी कुरिअरचे संचालक संतोष गांधी यांचा नुकताच अहिल्या नगर येथील जैन ओसवाल युवक संघातर्फे (जॉईज) जैन ओसवाल समाज गौरव या पुरस्काराने सन्मान करण्यात आला. या पुरस्काराबद्दल त्यांचा गांधी परिवारांच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी गांधी परिवाराचे सदस्य उपस्थित होते.



जैन ओसवाल समाज गौरव पुरस्काराबद्दल संतोष गांधी यांचा सत्कार करण्यात आला.

अहिल्यानगर शहरातील गांधी परिवाराचे सदस्य विविध क्षेत्रात कार्यरत राहून उल्लेखनीय कार्य करत आहेत. आपापला व्यवसाय सांभाळून ते समाजासाठी भरीव कार्य करत असतात. संतोष गांधी हे आपल्या कुरिअर व्यवसायाचा मोठा व्याप सांभाळून अनेक वर्षांपासून सामाजिक, आर्थिक, राजकारण, धार्मिक क्षेत्रात योगदान देत आहेत. कोणाच्याही अडीअडचणीत धावून जाण्याचा त्यांचा स्वभाव आहे. एक हसतमुख आणि सर्वांना आपलेसे करणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्या कार्याचा उचित सन्मान जैन ओसवाल समाज गौरव पुरस्काराने झाला आहे. संतोष गांधी यांचे कार्य सर्व गांधी परिवारांसाठी अभिमानास्पद आहे, असे प्रतिपादन राजेंद्र गांधी (आळेफाटावाला) यांनी केले.

यावेळी बोलताना संतोष गांधी म्हणाले, दिनदुबळ्यांची सेवा आणि गरजूंना मदत करण्याची आचार्य श्रींची शिकवण आचरणात आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत असतो. प्रत्येकाने समाज ऋणातून उतराई होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. सामाजिक, धार्मिक, अर्थकारण, राजकीय क्षेत्रात काम करताना नेहमीच सकल गांधी परिवाराच्या सदिच्छा व प्रोत्साहन लाभत असते. हा पुरस्कार माझ्या एकट्याचा नसून मला प्रोत्साहन देणाऱ्या सर्वांचा आहे. गांधी परिवारांनी केलेला सन्मान आणखी चांगले काम करण्याची प्रेरणा देणारा आहे.

# एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमीची ५२ वी राष्ट्रीय अबॅकस स्पर्धा उत्साहात

नगर – वेगवान गणिती गणना, विलक्षण एकाग्रता, स्मरणशक्ती आणि आत्मविश्वासाचा अद्भुत संगम अनुभवायला मिळालेल्या एव्हरेस्ट अबॅकस अॅक्डमीच्या ५२ व्या राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.विविध शहरांमधून आलेल्या तब्बल १,४०० विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे या राष्ट्रीय स्पर्धेला ज्ञानोत्सवाचे स्वरूप प्राप्त झाले.




एव्हरेस्ट अबॅकस अॅक्डमीच्या ५२ व्या राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेत 'चॅम्पियन ऑफ चॅम्पियन' हा मानाचा किताब कु. वेदीका शेजाळ हिला देताना आ. विक्रम पाचपुते.

या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून आमदार विक्रमसिंह पाचपुते, पोलीस उपनिरीक्षक सविता काळे, पंचायत समिती सदस्य अमित जाधव, नगरसेवक अमित जाधव, प्राचार्या नीता खामकर, उपमुख्याध्यापिका जयश्री खणसे, निलेश काळे, स्वप्निल तांबे, नितीन नलगे, अशोक कारले, अशोक घडेकर, अबॅकस नवसंशोधनातील पीएचडी प्राप्त डॉ. कल्पना घडेकर आदी मान्यवर उपस्थित होते.१,४०० विद्यार्थ्यांतून कु. वेदीका शेजाळ हिने आपल्या उत्कृष्ट कामगिरीची छाप उमटवत 'चॅम्पियन ऑफ चॅम्पियन' हा मानाचा किताब पटकावला. तिच्या उल्लेखनीय यशाबद्दल तिला स्मृतिचिन्हे व ३ हजार चे रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

अहिल्यानगर, पारनेर, कर्जत, सोलापूर, श्रीगोंदा, काष्टी आदी विविध शहरांमधून आलेल्या सुमारे १,४०० विद्यार्थ्यांनी स्पर्धेत आपले कौशल्य पणाला लावले. या स्पर्धेतून २० विद्यार्थ्यांनी 'चॅम्पियन' होण्याचा बहुमान पटकावला. यामध्ये लहान गट –ईश्वरी बोरुडे, प्रणाली चव्हाण, दिव्या मोरे, राजवर्धन शेडगे, शौर्य मिथे, श्रेयश साळुंखे, आराध्या केसवड, मित कुरुमकर, सर्वेश कोल्हे, दिव्या साळुंखे मोठ्या गटात प्रवीण कावळे, प्रथमेश गरुड, श्रावणी गायकवाड, आराध्या माने, ईश्वरी माने, अन्वय काळे, कल्याणी घनवट, स्वरा गवळी, अर्णव भालके, आर्य साळवे, वृषाली औटी, अपेक्षा जगतकर, विनायक कापसे, शुभेच्छा गायकवाड, श्रावणी पवार यांचा समावेश आहे.

उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षक/शिक्षिका माधुरी वेताळ, शीतल खेतमाळीस, औदुंबर गुंड यांना 'एव्हरेस्ट अबॅकस बेस्ट टीचर अवॉर्ड ', तर प्रतिभा पुजारी, वैशाली शेजाळ यांना एव्हरेस्ट अबॅकस स्टार टीचर अवॉर्डने सन्मानित करण्यात आले. तसेच अबॅकस क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सुमारे १५ विद्यार्थ्यांना 'एव्हरेस्ट अबॅकस मास्टर' या पुरस्काराने गौरविण्यात आले. रेश्मा कळमकर यांनी अबॅकसचे डेमो सादर करून विद्यार्थ्यांच्या गणनाक्षमतेमागील शास्त्र आणि पद्धत उपस्थितांसमोर उलगडून दाखवली. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रतिभा पुजारी यांनी केले. तर संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अमोल बागुल यांनी केले.

# जवानांना राखी बांधून देशसेवेला सलाम

नगर – भाऊ-बहिणीच्या प्रेमाचा आणि स्नेहाचा धागा अधिक घट्ट करणाऱ्या रक्षाबंधन सणाला देशसेवेची भावनिक किनार लाभली. पी. एम. श्री. डॉ. बाबासाहेब आंबेडकर छावणी परिषद शाळेतील विद्यार्थिनींनी आर्मड स्टॅटिक वर्कशॉपमधील जवानांच्या मनगटावर राखी बांधून रक्षाबंधन साजरे केले. सीमेवर तसेच देशाच्या संरक्षणासाठी अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करत विद्यार्थिनींनी त्यांना रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या.



आर्मड स्टॅटिक वर्कशॉपमध्ये जवानांना राखी बांधून रक्षाबंधन सण साजरा करताना विद्यार्थिनी.

केवळ सण साजरा न करता त्यामागील भावनेला सामाजिक आणि राष्ट्रीय मूल्यांची जोड देणारा हा उपक्रम उपस्थितांसाठीही भावनिक ठरला. यावेळी स्नेहबंधचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे, आर्मड स्टॅटिक वर्कशॉपचे कमांडंट मनराज सिंग, लेफ्टनंट कर्नल विमल चंद, लेफ्टनंट कर्नल नरेंद्र हळदणकर, सुभेदार मेजर सौरभ चंद्रसिंग उपस्थित होते. तसेच पीएमश्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर छावणी परिषद शाळेच्या शिक्षिका स्नेहल लवांडे, सायली लेंडे आदी उपस्थित होते.

जवानांचे आयुष्य म्हणजे कर्तव्य, शिस्त आणि देशसेवेचा ध्यास. कुटुंबापासून दूर राहून देशाच्या सुरक्षेसाठी योगदान देणाऱ्या जवानांना रक्षाबंधनाच्या दिवशी विद्यार्थिनींनी दिलेला हा प्रेमाचा धागा विशेष ठरला. राखीच्या माध्यमातून विद्यार्थिनींनी जवानांच्या त्यागाला आणि देशसेवेला सलाम केला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रनिष्ठा, सामाजिक बांधिलकी आणि कृतज्ञतेची भावना रुजविण्याचा संदेश देण्यात आला. रक्षाबंधन निमित्त विद्यार्थिनी आणि जवान यांच्यात निर्माण झालेला हा स्नेहाचा धागा केवळ राखीपुरता मर्यादित न राहता देशप्रेम आणि कृतज्ञतेचा संदेश देणारा ठरला. जवानांच्या मनगटावर बांधलेली राखी आणि विद्यार्थिनींच्या मनातील आदरभाव यामुळे आर्मड स्टॅटिक वर्कशॉप मधील रक्षाबंधनाचा सोहळा अविस्मरणीय ठरला.

